# तृतीय वर्ष कला

## सत्र - VI (CBCS)

# अर्थशास्त्र अभ्यासपत्रिका -XVI

# ग्रामीण विकास

## विषय कोड : ECORDC604

© UNIVERSITY OF MUMBAI

**प्राध्यापक डॉ. डी. टी. शिर्के**
स्थानापन्न कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राचार्य डॉ. अजय भामरे**
स्थानापन्न प्र-कुलगुरु,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक प्रकाश महानवर**
संचालक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्रकल्प समन्वयक** : **डॉ. राजश्री पंडित**
सहाय्यक प्राध्यापक आणि साहाय्यक संचालक,
प्रभारी वाणिज्य विभाग प्रमुख,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**अभ्यास समन्वयक आणि संपादक** : **डॉ. प्रतिक्षा नारायण टिकार**
सहाय्यक प्राध्यापक (अर्थशास्त्र)
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**लेखक** : **डॉ. विष्णु एकनाथ घुमटकर**
सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
श्रीमती. एस. आर. एम. महिला महाविद्यालय,
खामगाव, जि. बुलढाणा

: **डॉ. गोपाल एकनाथ घुमटकर**
सहाय्यक प्राध्यापक (अर्थशास्त्र)
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

: **डॉ. निलीमा राजाराम मिरजकर**
एम. टी. इ. एस. दोषी वकील कला आणि
जी. सी. यु.बी. वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
गोरेगाव, जि. रायगड

: **प्रा. सुर्यकांत प्रभाकर माने**
सहाय्यक प्राध्यापक,
एम. आय. टी. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
देहू फाटा, आळंदी, ता. खेड, जि. पुणे

**एप्रिल २०२३, मुद्रण - १**

**प्रकाशक :** संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, मुंबई -४०० ०९८.

**अक्षर जुळणी व मुद्रण** : मुंबई युनिव्हर्सिटी प्रेस,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई - ४०००९८

## अनुक्रमणिका


| क्रमांक | अध्याय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **मॉड्युल - १** | |
| १. | ग्रामीण विकासाचे परिचयात्मक पैलू - १ | ०१ |
| २. | ग्रामीण विकासाचे परिचयात्मक पैलू - २ | १७ |
| | **मॉड्युल - २** | |
| ३. | ग्रामीण विकासाचे दृष्टिकोन - १ | २२ |
| ४. | ग्रामीण विकासाचे दृष्टिकोन - २ | ३६ |
| | **मॉड्युल - ३** | |
| ५. | ग्रामीण अर्थव्यवस्थेचे विविधीकरण - १ | ४५ |
| ६. | ग्रामीण अर्थव्यवस्थेचे विविधीकरण - २ | ५७ |
| | **मॉड्युल - ४** | |
| ७. | ग्रामीण विकास कार्यक्रम - १ | ७० |
| ८. | ग्रामीण विकास कार्यक्रम - २ | ८१ |


❖❖❖❖

## TYBA ECONOMICS (SEMESTER-VI)

| COURSE CODE | GROUP-II : ELECTIVE PAPER<br>PAPER NO – XVI | CREDIT | MARKS |
|---|---|---|---|
| **ECORDC604** | **RURAL DEVELOPMENT** | **4** | **100** |

### Course Objectives

This course would helpful to understand the various types of relationships in rural area. The learners will understand the basic issues in rural development. The course sheds light on a range of new developments and a host of issues studied by generations of rural area experts. The course is constructed from the p of rural development arrangement.

### Course Outcomes

- On the completion of the course, the students will be able to understand the basic Concept of r development.
- Learners will also be understanding objectives and importance of rural development.
- Learners will have good understanding of problems in relation of rural development.
- Learners will come to know what rural development programmes have initiated by the governmer overcome the problems of rural development

### Module 1: Rural Development: Introductory Aspects (12 Lectures)

Concept, Nature and Scope of Rural Development, Charactersties of the Rural Economy, Objectives and Importance of Rural Development, The problems of Rural Development in India

### Module 2: Approaches to Rural Development (12 Lectures)

Gandhian Approach, Rural Reconstruction Approach, Community Development Approach, Sectoral Approach, Participatory Approach, Area- Specific and Target Group Oriented Approach, Integrated Rural Development and Economic Development with Social Justice Approach

**Module 3: Diversification of Rural Economy** **(12 Lectures)**

Livestock economics, Dairy Development, Social Forestry, Agro-Based Industries: Problems & Remedial Measures, Role of KVIC in Rural Development, Recent Development of Science & Technology in Rural Development.

**Module 4: Rural Empowerment Programmes** (**12 Lectures)**

An Overview of Rural Development Programmes, Provisions of Urban Amenities in Rural Area (PURA), Rural Employment: Mahatma Gandhi National Rural Employment Guarantee Act-2005 (MGNREGA), Rural Livelihoods: Deendayal Antyodaya Yojana - National Rural Livelihoods Mission (DAY-NRLM), National Social Assistance Programme (NSAP), Microfinance and Self-help Groups

**References:**


1. Thomas William and A.J. Christopher (2011), Rural Development: Concept and Recent Approaches, Rawat Publication, Jaipur.
2. Annual Report 2019-20, 2018-19 & State performance report-2018-19 and Action plan 2019-20, Volume-I, Ministry of Rural Development, Department of Animal Husbandary & Dairying, Government of India, New Delhi.
3. Datt & Sundharam (2012), Indian Economy, S. Chand & Company LTD. Mumbai.
4. Desai Vasant (2012), Rural Development in India, Himalaya Publishing House, Mumbai.
5. Dr. I. Satya Sundaram (2002), Rural Development, Himalaya Publishing House, Mumbai. Page No. 3 to 24
6. Eleventh Five Year Plan 2007-12, Planning Commission, Government of India, New Delhi.

# १

## ग्रामीण विकासाचे परिचयात्मक पैलू – १

**घटक रचना :**

१.० उद्दिष्टे

१.१ ग्रामविकासाची संकल्पना

१.२. ग्रामीण विकासाचे स्वरूप

१.३. ग्रामीण विकासाची व्याप्ती

१.४ ग्रामीण अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये

१.५ सारांश

१.६ प्रश्न

१.७ संदर्भ

## १.० उद्दिष्टे

- ग्रामीण विकासाची संकल्पना जाणून घेणे.
- ग्रामीण विकासाचे स्वरूप अभ्यासणे.
- ग्रामीण विकासाच्या व्याप्तीवर चर्चा करणे.
- ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास करणे.

## १.१ ग्रामविकासाची संकल्पना

ग्रामीण विकासाची निश्चित अशी संकल्पना आढळत नसली तरी विचारवंतांनी ढोबळ मनाने अनेक संकल्पना केल्या आहेत. परंतु ग्रामीण विकास ही संकल्पना समजावून घेण्यापूर्वी ग्रामीण व विकास या दोन शब्दांचा अर्थ समजावून घेणे आवश्यक आहे.

**ग्रामीण म्हणजे काय?**

ग्रामीण हा शब्द ग्रामीण समुदायाशी निगडीत आहे. भौगोलिकदृष्ट्या विशिष्ट स्वरुपाची वैशिष्ट्ये असणाऱ्या समुदायास ग्रामीण भाग असे संबोधले जाते. काही समाजशास्त्रज्ञांच्या मते जे शहर नाही ते गाव होय. त्यालाच खेडे देखील संबोधले जाते. जो जमिन कसतो त्याला खेडूत असे म्हणतात आणि अशा खेडूतांच्या समुदायास खेडे असे म्हणतात. ज्या

प्रादेशिक क्षेत्रातील समुदायाचा प्रमुख व्यवसाय आणि उदरनिर्वाहाचे साधन शेती आहे तो ग्रामीण समुदाय होय. ज्या भौगोलिक क्षेत्रातील पन्नास टक्क्याहून अधिक लोकसंख्या शेती या प्रमुख व्यवसायावर अवलंबून आहे त्या क्षेत्राला 'ग्रामीण' समजले जाते.

**विकास म्हणजे काय?**

विकास हा शब्द अर्थशास्त्रात अधिक प्रचलित आहे. ग्रामीण विकासाच्या संदर्भात विकास या शब्दात तीन घटकांचा समावेश करता येतो. यामध्ये कृषी विकास, आर्थिक विकास व ग्रामीण समुदायाचा सर्वांगीण विकास हे घटक महत्त्वाचे मानले जातात. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा करणे म्हणजे विकास होय ..

**ग्रामीण विकास म्हणजे काय?**

१) **श्री. रॉबर्ट मॅकनामारा** यांच्या मते, “ग्रामीण भागातील दुर्बल घटक म्हणजे छोटे शेतकरी, भूमीहीन शेतमजूर आणि ग्रामीण कारागीर यांच्या विकासावर भर देऊन ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास करणे म्हणजे ग्रामीण विकास होय.”

२) **डॉ. स्वामीनाथन** यांच्या मते, “ग्रामीण भागातील दुर्बल घटकांना सक्षम करण्याची प्रक्रिया म्हणजे ग्रामीण विकास होय.”

३) **चेस्टर बोल्स** यांच्या मते, ‘ग्रामीण विकास फक्त शेती विकासापुरता मर्यादीत नसून लघुउद्योग, शाळा, प्रशिक्षण केंद्र, प्रगत दळणवळण, खेड्यातील विदयुत पुरवठा, सार्वजनिक आरोग्य, लोकसंख्या नियंत्रण केंद्र यांची वृद्धी करणे आणि ग्रामीण संस्कृतीला उत्तेजन देणे म्हणजे ग्रामीण विकास होय.”

४) ग्रामीण जनतेने स्वतः उपक्रमशील राहुन स्वावलंबी जीवन जगण्याचा प्रयत्न करणे, ग्रामीण जनतेच्या या प्रयत्नांकरिता तांत्रिक व इतर सेवा यांची तरतुद करणे आणि आपल्यामध्ये परिवर्तन घडवून आणणे म्हणजे ग्रामीण विकास होय.

५) ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांचे दारिद्र्य, बेरोजगारी, निरक्षरता व आरोग्य या चार समस्या सोडवून त्यांच्या राहणीमानाची पातळी उंचावणे आणि ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासावर भर देणे म्हणजे ग्रामीण विकास होय.

६) ग्रामीण भागातील नैसर्गिक साधनसंपत्तीचा योग्य व पर्याप्त वापर करुन गरिबातील गरिब अशा दुर्बल घटकांचा विकास साधणे म्हणजे ग्रामीण विकास होय.

वरील संकल्पनांवरुन असे स्पष्ट होते की, ग्रामीण विकास ही ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचा विकास करण्याची प्रक्रिया आहे. यासाठी दारिद्र्य निर्मूलन आणि रोजगार निर्मीतीचे कार्यक्रम हाती घेणे आवश्यक आहे. त्याचबरोबर किमान गरजांची सोडवणूक करण्यासाठी प्रयत्नशील समाज बनविण्याची गरज आहे. ग्रामीण जीवन, ग्रामीण लोकसमुदाय, ग्रामीण भागाच्या समस्या व यांचे निराकरण आणि ग्रामीण विकास प्रक्रियेचा अभ्यास करुन विकासाचे मार्ग शोधून काढणे व त्याचा अवलंब करण्यास ग्रामीण समाजाला प्रवृत्त करणे अभिप्रेत आहे.

ग्रामीण विकासाची संकल्पना अधिक विस्ताराने स्पष्ट करण्याच्या दृष्टिने त्यामध्ये पुढील गोष्टींचा समावेश करणे आवश्यक आहे.

१) प्राथमिक गरजांची पूर्तता करणे. यामध्ये शुद्ध पिण्याचे पाणी प्रत्येक गावात उपलब्ध करुन देणे, चांगल्या प्रतीचे व पुरेसे धान्य योग्य किंमतीत उपलब्ध करुन देणे, निवारा व्यवस्था, ग्रामीण विदयुतीकरण, शैक्षणिक सुविधा, आरोग्य विषयक सुविधा इत्यादी सोयी निर्माण करणे.

२) शेतीवर आधारित उदयोगांची गावपातळीवर निर्मिती करणे, उद्योगांसाठी मुलभूत सुविधा निर्माण करणे, किमान कौशल्याच्या सुविधा निर्माण करणे, वाहतूक, दळणवळण बाजारव्यवस्था निर्माण करणे.

३) गावपातळीवर किंवा गावाच्या परिसरात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे व त्या माध्यमातून कायमस्वरूपी व उत्पादक मालमत्ता निर्माण करणे.

४) गाव, वाडी, पाडा या ठिकाणी प्राथमिक शिक्षणाच्या सुविधा निर्माण करणे, गावांच्या मध्यवर्ती ठिकाणी माध्यमिक शाळा शक्य तिथे कनिष्ठ महाविद्यालयांची सोय करणे आणि त्याद्वारे ग्रामीण जनतेचा शैक्षणिक दर्जा सुधारणे.

५) समाज परिवर्तनासाठी व सांस्कृतिक विकासासाठी गाव पातळीवर वाचनालये, दुरदर्शन संच, कृषी विस्तार केंद्र इत्यादी सोयी उपलब्ध करुन देणे.

६) मानवी संपत्तीची कार्यक्षमता वाढविण्यासाठी व विकास कार्यात पुरेपुर वापर करुन घेण्यासाठी आरोग्य केंद्राची निर्मिती करणे, मोफत किंवा सवलतीच्या दरात आरोग्य सेवांचा 1 पुरवठा करणे, अंधश्रद्धा निर्मूलन कार्यक्रम राबविणे.

७) स्वावलंबन, सहकार्य व नेतृत्त्व गुणांचा विकास साधून स्वतःच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्नशील राहण्याची शिकवण देणे.

८) ग्रामीण भागात रस्त्यांचे जाळे निर्माण करणे. कच्च्या रस्त्यांचे पक्क्या रस्त्यात रुपांतर करणे, वाहतुक साधनांचा विकास साधणे व ग्रामीण भागातील उत्पादने शहरी भागातील मोठ्या बाजारपेठांमध्ये विक्रीसाठी सुविधा निर्माण करणे.

९) नैसर्गिक साधन संपत्तीचा विकास साधणे, सुप्त अवस्थेत असलेल्या साधनसंपत्तीचा आर्थिक विकासासाठी उपयोग करुन घेणे, आवश्यक त्या घटकांची पुनः निर्मिती करणे.

१०) शेती, शेतीपुरक व जोडव्यवसायांचा विकास साधणे यासाठी आवश्यक असलेल्या मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देणे, पुरेसे अर्थसहाय्य करणे.

**आपली प्रगती तपासा.**

१) ग्रामीण विकासाची संकल्पना स्पष्ट करा.

## १.२ ग्रामीण विकासाचे स्वरूप

ग्रामीण विकासाचे स्वरूप स्पष्ट करताना ग्रामीण विकास या सामाजिक शास्त्राचे स्वरूप व ग्रामीण विकास प्रक्रियेचे स्वरूप स्वतंत्रपणे समजावून घेणे अधिक संयुक्तिक ठरेल.

### १.२.१ ग्रामीण विकास एक सामाजिक शास्त्र :-

**१) ग्रामीण समुदाय व त्यांच्या समस्यांचा अभ्यास :**

ग्रामीण विकास या विद्याशाखेत ग्रामीण पर्यावरण व त्यातील लोकसमुदाय यांच्यातील आंतरक्रियेचा अभ्यास करण्यात येतो. ग्रामीण पर्यावरणात ग्रामीण भागातील सामाजिक, आर्थिक, राजकिय व सांस्कृतिक परिस्थितीचा समावेश होत असतो. ग्रामीण समुदायात दारिद्र्य, निरक्षरता, अंधश्रद्धा, अनारोग्य, गतिशीलतेचा अभाव, दैववादी वृत्ती, सामाजिक परिवर्तनास होणारा विरोध किंवा त्याबाबत असलेली अनुत्सुकता या समस्या दिसून येतात. ग्रामीण विकास या सामाजिक शास्त्रात वर दिलेल्या समस्यांचे विवेचन करण्यात येते.

**२) आदर्शवाद :-**

ग्रामीण समुदाय व त्यांच्या समस्यांचा अभ्यास करत असताना या समस्या सोडविण्यासाठी कोणत्या उपाययोजना करणे आवश्यक आहे याचे ही विवेचन करण्यात येते. ग्रामीण विकासासाठी ग्रामीण विविधीकरण, ग्रामीण बेरोजगारी निर्मुलनासाठी स्वयंरोजगार निर्मिती, ग्रामसभेच्या माध्यमातुन ग्रामस्तरावरील नियोजन प्रक्रियेत ग्रामस्थांचा सक्रिय सहभाग, स्वयंसेवी संघटनांद्वारा जनजागृती, सहकारांच्या माध्यमातुन दुर्बल घटकांचा विकास इत्यादी प्रकारच्या उपाययोजना सुचविल्या जातात. महात्मा गांधीजींची ग्राम स्वराज्याची संकल्पना, बलवंतराय मेहता यांची लोकशाही विकेंद्रीकरणाची संकल्पना या ग्रामीण समाजासाठी आदर्श संकल्पना आहेत. सदय परिस्थिती बदलणे आणि आदर्शवाद परिस्थिती निर्माण करण्यासाठी मार्गदर्शन करणे ही जबाबदारी ग्रामीण विकास या सामाजिक शास्त्रात पार पाडली जाते.

**३) सैद्धांतिक आणि उपयोजित पैलू :**

ग्रामीण विकास या सामाजिक शास्त्रातील उपयोजित पैलू अधिक महत्त्वपूर्ण आहेत कारण ग्रामीण विकास हे एक कृतीशील सामाजिक शास्त्र आहे. ग्रामीण विकास या सामाजिक शास्त्राचा जन्मच ग्रामीण समुदायाच्या समस्यांचे निराकरण करण्याच्या उद्देश्याने झाला आहे. त्यामुळे ग्रामीण विकासासाठी हाती घेतल्या जाणाऱ्या विविध शासकिय व बिगर शासकिय उपक्रमांचा अभ्यास या सामाजिक शास्त्रात करण्यात येतो.

**४) आंतर विद्याशास्त्रीय :**

ग्रामीण विकास हे एक सामाजिक शास्त्र असले तरी वास्तव अर्थाने या शास्त्राचे पैलू भौतिक, जैविक व सामाजिक शास्त्रीय आहेत. शेती आणि ग्रामीण अर्थशास्त्र, जैविक अभियांत्रिकी आणि परिसर अभियांत्रिकी असे या आंतरविद्याशास्त्रीय शास्त्रांचे विविध पैलू आहेत. त्याचे स्वरुप सर्वसमावेशक आहे.

### १.२.२ ग्रामीण विकास एक प्रक्रिया :-

ग्रामीण विकास ही ग्रामीण समुदायात सर्वांगीण परिवर्तन घडवून आणण्याची प्रक्रिया आहे. या प्रक्रियेचे स्वरुप खालीलप्रमाणे आहे.

**१) लोकचळवळ :**

सामुहिक विकास कार्यक्रम ग्रामीण विकासाच्या उद्देशाने सुरु करण्यात आला. कालांतराने सामुहिक विकास कार्यक्रम एक लोकचळवळ झाली. कारण ग्रामीण विकास हा लोकांचा, लोकांसाठी आणि लोकांद्वारे राबविला जाणारा कार्यक्रम आहे. ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेत लोकसमुदायात विकासाची आकांक्षा असणे आणि त्या आकांक्षेच्या पूर्तीसाठी विकास प्रक्रियेत लोकांचा उस्फुर्त आणि सक्रिय सहभाग मिळविण्याच्या उद्देशाने बलवंतराय मेहता यांनी लोकशाही विकेंद्रीकरणाची संकल्पना मांडली आणि त्रिस्तरीय पंचायती राज व्यवस्थेची शिफारस केली. त्यानुसार त्रिस्तरीय यंत्रणा अस्तित्वात आली. ग्रामीण विकासासाठी स्वयंसेवी संघटना पुढे आल्या. सहकाराच्या माध्यमातून विकास प्रक्रिया गतिमान होत गेली आणि ग्रामीण विकासाचे स्वरुप सर्व समावेशक झाले.

**२) व्यापक उद्दीष्ट्ये :**

ग्रामीण विकासाची उद्दीष्ट्ये व्यापक स्वरुपाची आणि ग्रामीण जीवनाच्या सर्व पैलूंचा समावेश करणारी आहेत. कृषी विकास, जलसाधनांचा विकास, संरचनात्मक सोयींचा विकास, मानवी साधनसंपत्तीचा विकास, नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन व पर्याप्त वापर, आर्थिक विकास, सामाजिक परिवर्तन इत्यादी सर्वसमावेशक उद्दीष्ट्ये ठेवण्यात आली आहेत. या उद्दीष्ट्यांच्या पूर्तीसाठी कार्यक्रम, योजना, उपक्रम व प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. म्हणून ग्रामीण विकासाचे स्वरुप व्यापक होत आहे.

**३) प्रक्रिया उदयोग :**

ग्रामीण भागात शेतमालावर प्रक्रिया करणारे उद्योग विकसित करुन ग्रामीण औद्योगीकरणाला चालना देणे, सहकारी तत्त्वावर उद्योग प्रस्थापित करुन उत्पादनाचे अधिक फायदे सर्वसामान्य शेतकऱ्याला मिळवून देणे.

**४) संरचनात्मक सोयी सुविधा :**

ग्रामीण वाहतूक व दळणवळणाची साधने उपलब्ध करुन देणे, पिण्याच्या पाण्याच्या सुविधा निर्माण करणे, ग्रामीण विद्युतीकरण करणे, शैक्षणिक सुविधांचा विकास साधणे, आरोग्याच्या सोयी उपलब्ध करुन देणे आणि एकंदरीत मानवी संपत्तीच्या विकासाला पोषक वातावरण निर्माण करणे.

**आपली प्रगती तपासा :**

१) ग्रामीण विकासाचे स्वरुप स्पष्ट करा.

## १.३ ग्रामीण विकासाची व्याप्ती

भारत हा आकारमानाने विशाल देश आहे, देशाचे क्षेत्रफळ ३२,८७,२६३ चौ. कि.आहे. देशाची एकूण लोकसंख्या १२० कोटीच्या वर असुन ग्रामीण भागात वास्तव्य करणारी लोकसंख्या जवळजवळ ७०% आहे. ग्रामीण भागातील भौगोलिक परिस्थिती भिन्न-भिन्न स्वरुपाची आहे. हवामान, पर्जन्यमान, जमिनीचा दर्जा, नैसर्गिक साधन संपत्ती व ग्रामीण भागात केले जाणारे व्यवसाय यामध्ये मोठ्या प्रमाणात भिन्नता आहे. ग्रामीण भागात वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या समस्या आहेत. त्या समस्या सोडविण्यासाठी स्वातंत्र्य प्राप्तीनंतर अनेक प्रयत्न होऊनही समस्या पूर्णपणे सुटलेल्या नाहीत. म्हणून या समस्या सोडविण्याच्या दृष्टिने ग्रामीण विकासाला महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे ग्रामीण विकासाची व्याप्ती मोठी आहे. ही ग्रामीण विकासाची व्याप्ती आपल्याला खालील मुद्द्यावरून स्पष्ट करता येईल.

**१) ग्रामीण व्यवसायांचा विकास :**

शेती हा ग्रामीण भागातील मुख्य व्यवसाय आहे. देशातील एकूण लोकसंख्येपैकी ६४.५% लोकसंख्या प्रत्यक्ष शेती व्यवसायात गुंतलेली आहे. परंतु बहुतांशी शेतकरी अल्प व अत्यल्प भू-धारक असल्यामुळे परंपरागत पद्धतीने शेती करतात. त्यामुळे शेती व्यवसायाचा विकास झालेला नाही. आर्थिक परिस्थितीमुळे या कुटुंबाना शेतीत भांडवली गुंतवणूक करुन शेतीचा विकास साधता येत नाही, म्हणून शेती व्यवसायाला भांडवल पुरवठा, पाणी पुरवठ्याच्या सोयी व आदानांचा पुरवठा करुन शेती बरोबरच जोड व पुरक उद्योगांचा विकास महत्त्वाचा आहे. या उदयोगांमधून ग्रामीण कुटुंबांना नियमित उत्पन्न मिळण्यासाठी त्यांचा विकास साधणे आवश्यक आहे. म्हणून ग्रामीण भागातील व्यवसायांचा विकास साधण्याच्या दृष्टिने ग्रामीण विकासाची व्याप्ती मोठी आहे.

**२) मुलभूत सुविधा :**

ग्रामीण विकासाला पोषक वातावरण निर्माण होण्यासाठी ग्रामीण भागात मुलभूत सुविधांची आवश्यकता आहे. यामध्ये वाहतूक, दळणवळण, बाजारपेठा, विदयुतपुरवठा, पाणी पुरवठ्यांच्या सुविधांचा पुरेश्या प्रमाणात विकास साधण्याच्या दृष्टिने ग्रामीण विकासाची व्याप्ती वाढली आहे.

**३) औद्योगिक विकास :**

ग्रामीण भागात केले जाणारे सर्व व्यवसाय प्राथमिक स्वरुपाचे आहेत. या व्यवसायांमधून कच्च्या मालाची निर्मीती केली जाते. मात्र कच्च्या मालावर प्रक्रिया करणारे उद्योग शहरी भागात अधिक प्रमाणात आहेत. त्यामुळे उत्पादनाचे अधिक फायदे शहरी भागातील व्यापारी वर्गाला मिळतात, परिणामी ग्रामीण भागाचा आर्थिक विकास होत नाही, म्हणून ग्रामीण भागात उत्पादीत होणाऱ्या कच्च्या मालावर प्रक्रिया करणारे उद्योग ग्रामीण भागात सुरु करुन ग्रामीण औद्योगीकरण करण्यासाठी मोठी संधी आहे.

**४) सामाजिक विकास :**

ग्रामीण भागात अनेक जाती धर्माचे लोक वास्तव्य करीत असून परंपरेने चालत आलेल्या अनेक अनिष्ट प्रथा ग्रामीण समाजात आढळून येतात. त्यामुळे त्यांच्या विकासावर त्याचा विपरीत परिणाम होत आहे. ग्रामीण समाज विखुरलेल्या स्वरुपात असुन दुर्गम भागात वास्तव्य करणाऱ्या अतिमागास समाजात अनेक समस्या आहेत. या संपूर्ण समाजाचा विकास साधण्यासाठी त्यांना विकास प्रक्रियेत सामावून घेण्याची आवश्यकता आहे. म्हणून या समाजाच्या मुलभूत समस्या सोडविण्यासाठी व सामाजिक विकास घडवून आणण्यासाठी ग्रामीण विकासाची व्याप्ती वाढली आहे.

**५) मानवी संपत्तीचा विकास :**

ग्रामीण मानवी साधन संपत्तीचा विकास प्रक्रियेत पुरेपुर वापर करुन घेण्यासाठी प्रथम मानवी साधन संपत्तीचा विकास साधणे आवश्यक आहे. यासाठी ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार करुन उच्च शिक्षणाच्या सुविधा निर्माण करणे आवश्यक आहे. मानवी साधन संपत्तीमध्ये कौशल्य निर्माण करण्यासाठी प्रशिक्षण सुविधांची आवश्यकता आहे. मानवी कार्यक्षमता वाढविण्यासाठी व कार्यक्षमता टिकवून ठेवण्यासाठी आरोग्य सुविधांची आवश्यकता असते. तरच मानवी शक्तीचा पुरेपुर वापर विकास कार्यात करुन घेता येतो. म्हणून ग्रामीण मानवी साधनसंपत्तीचा विकास साधून आर्थिक विकासाला गती प्राप्त करुन देण्यासाठी ग्रामीण विकासाची व्याप्ती अधिक आहे.

**६) नैसर्गिक साधनसंपत्तीचा विकास :**

ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात नैसर्गिक साधनसंपत्ती उपलब्ध आहे. परंतु या नैसर्गिक साधनसंपत्तीचा पुरेपुर विकास न साधल्यामुळे ही साधनसंपत्ती सुप्त अवस्थेत पडून आहे. अशा साधनसंपत्तीचा विकास साधण्यासाठी मोठ्या प्रमाणात भांडवलाची आवश्यकता आहे. तरच या साधनसंपत्तीचा आर्थिक विकासासाठी उपयोग करुन घेता येतो. म्हणून भूसंपत्ती, जलसंपत्ती, खनिज संपत्ती, पशुसंपत्ती, सागरी संपत्ती इत्यादी घटकांचा योग्य प्रमाणात विकास साधण्यासाठी व आर्थिक विकासात उपयोग करुन घेण्यासाठी ग्रामीण विकासाची व्याप्ती वाढली आहे.

**७) लोकसंख्या नियंत्रण :**

ग्रामीण भागातील जलद गतीने वाढणारी लोकसंख्या हा ग्रामीण विकासातील महत्त्वाचा अडसर आहे. लोकसंख्या वाढीचा वेग तसाच ठेऊन आर्थिक विकासाचे कितीही प्रयत्न केले, तरी ते अपुरे पडणारे आहेत. लोकसंख्या नियंत्रण हा महत्त्वाचा घटक असल्यामुळे ग्रामीण विकासाची व्याप्ती अधिक आहे.

**आपली प्रगती तपासा.**

१) ग्रामीण विकासाची व्याप्ती स्पष्ट करा.

## १.४ ग्रामीण अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये

### १) कुटुंबावर आधारित समाजजीवन व संयुक्त कुटुंबपद्धती :

ग्रामीण समाजरचनेत कुटुंब हे केंद्रस्थानी असून समाजजीवनात त्यास अत्याधिक महत्त्व आहे. भारतीय ग्रामीण समाजात व्यक्तीला प्राधान्य नसून त्याची सामाजिक प्रतिष्ठा बऱ्याच प्रमाणात त्यांच्या कुटुंबावर अवलंबून असते, व्यक्ती अमुक एका कुटुंबाची सभासद म्हणून ओळखली जाते. सामाजिक नियंत्रणाच्या दृष्टीनेदेखील कुटुंबच महत्त्वाचे ठरते. व्यक्तीपेक्षा कुटुंबावरच अधिक सामाजिक जबाबदारी असते. धार्मिक, सामाजिक व राजनैतिक क्षेत्रांतदेखील कुटूंबाच्या सर्व सभासदात एकी व समानता आढळते. ग्रामीण क्षेत्रात कुटुंबाचे सर्व सभासाद अधिक प्रमाणात कुटुंबावर अवलंबून असतात. आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक गरजांची पूर्ती करण्याचे कार्य कुटूंबच करीत असल्याने व्यक्तीवर कुटूंबाचा सर्वात अधिक प्रभाव असलेला दिसतो,

भारतीय ग्रामीण समुदायात संयुक्त कुटुंबपद्धती प्रामुख्याने आढळते. माता, पिता त्यांची मुले व अनेक पिढ्यांपर्यंतचे सदस्य एकाच घरात, एकाच सामाजिक मालमत्तेवर आपली उपजीविकात्मक करताना दिसतात. भारतातील संयुक्त कुटुंबपद्धती पितृसत्तात्मक आहे. कुटुंबातील वृद्ध व्यक्ती कुटुंबाचा कर्ता म्हणून ओळखली जाते. शेती हा प्रधान व्यवसाय असलेल्या जीवनास पोषक अशीच ही कुटुंबपद्धती असल्यामुळे अगदी सुरूवातीपासून भारतीय ग्रामीण समुदायात ती आढळून येते.

अग्रगण्य समाजशास्त्रज्ञ सरोकिन व जिमरमेन यांनी सांगितलेले ग्रामीण समुदाय पुरेपूर लागू पडते. 'कुटुंबवादाची' कल्पना स्पष्ट करताना सरोकिन व गाल्पीत म्हणतात, "कुटुंब ग्रामीण समाज जीवनाची एक मूलभूत सामाजिक संस्था असल्यामुळे ग्रामीण कुटुंबातील वैशिष्ट्यांची छाप या कृषिसमूहाच्या सर्व सामाजिक संघटनावर पडल्यास नवल नाही. दुसऱ्या शब्दात असे म्हणता येईल की, इतर सर्व सामाजिक संस्था व मूलभूत सामाजिक संबंध ग्रामीण कौटुंबिक संबंधाद्वारे निश्चित व निर्धारित झालेले दिसतात. अशा प्रकारच्या सामाजिक संघटनेस संबोधिक करण्याकरिता 'कुटुंबवाद' (Familism) या शब्दाचा वापर केला जातो. सर्व प्रकारच्या सामाजिक संस्था व सामाजिक संबंधियावर कौटुंबिक संबंधाची छाप पडलेली असून राजनैतिक क्षेत्रातदेखील राजा व प्रजेचा संबंध पिता-पुत्राच्या संबंधासारखा असावा, ज्यात शासक प्रजेकरिता पित्याची भूमिका वठवीत असतो. थोडक्यात असे म्हणता येईल की, भारतीय ग्रामीण व्यक्तीच्या जीवनातील सर्व अंगावर कुटुंबाचा पूर्ण प्रभाव असलेला दिसतो. "

### २. जातिप्रथेवर आधारित समाजरचना :

भारतीय ग्रामीण समुदायात संयुक्त कुटुंबास जितके महत्त्व आहे तितकेच महत्त्व जातिप्रथेला देखील आहे. आजदेखील ग्रामीण समुदायात पद, दर्जा व सामाजिक संबंधाचे स्वरूप जातीनुसारच निश्चित झालेले दिसते. संपूर्ण समुदाय जातीच्या आधारावरच अनेक खंडांत विभाजित झालेला दिसतो. कुटुंबाच्या नियमाइतकेच जातिनियमाचे वर्चस्व ग्रामीण लोकांवर आहे.

व्यवसायाचे रहस्य आपल्याच जातीत राहावे या उद्देशाने प्रत्येक जातीचे सदस्य स्वत : चा एक स्वतंत्र व्यवसाय करीत असून ग्रामीण आर्थिक जीवनात या सर्व जाती परस्परांवर अवलंबून असल्या तरी प्रत्येक जातीचा त्यांच्या परंपरागत व्यवसायावर एकाधिकार असलेला दिसतो. शेतीचा व्यवसाय मात्र याला अपवाद आहे.

खेड्यातील क्षेत्रीय विभागणीदेखील जातीच्या आधारावरच झालेली असते. डॉ. इरावतीबाई कर्वे यांनी केलेल्या ग्रामीण क्षेत्राच्या अध्ययनात त्या म्हणतात एखाद्या ग्रामीण विभागाचा नकाशा पाहिल्यास असे दिसून येते की, प्रत्येक जातीचे वास्तव्य खेड्याच्या एका विशिष्ट भागात दिसते.

काही निवडक जातीच्या लोकांची घरे गावात एकमेकांच्या जवळ असतील. परंतु अस्पृश्य जाती मात्र गावापासून थोडे दूर, वेगळे वास्तव्य करतात. ब्राह्मणआळी, सोनारआळी, कुंभारवाडा ही नावे याचीच द्योतक आहेत. महाराष्ट्रातील प्रत्येक खेड्यात महारवाडा आढळून येतो व तेथेच महारजातीच्या लोकांची वस्ती असते, असे आढळून येते. गावात प्रत्येक जातीचे वेगळे निवासस्थान असण्याच्या या प्रवृत्तीचे स्पष्टीकरण जातीची श्रेष्ठ, कनिष्ठता, शुद्ध - अशुद्धतेची भावना किंवा प्रत्येक व्यवसायाकरिता आवश्यक असणारी जागा यांच्या आधारावर करता येईल. डॉ. इरावतीबाई कर्वेच्या मते, भारतीय संस्कृतीत स्वत:चा एक स्वतंत्र गट करून वेगळे राहण्याची प्रवृत्ती मुळातच आहे.

ग्रामीण नेतृत्वाचे स्वरूपदेखील बऱ्याच प्रमाणात जातीच्या आधारावरच निश्चित होते. ग्रामीण क्षेत्रात आजदेखील परंपरागत नेतृत्वास विशेष स्थान आहे. बदलत्या सामाजिक परिस्थितीत उच्चजातीकडून हे नेतृत्व दुसऱ्या जातीकडे जात आहे, पण नवीन नेतृत्व ज्या जातीतून विकसित होत आहे त्या जाती संख्येच्या दृष्टीने प्रबळ अशाच आहेत.

थोडक्यात असे म्हणता येईल की, दर्जा, पद, सामाजिक संबंध, व्यवसाय, निवासस्थान, ग्रामीण नेतृत्व या सर्व बाबतीत आजही भारतीय ग्रामीण जीवनात जातींना विशेष स्थान आहे.

**३) ग्रामीण समुदायाचे एकाकी स्वरूप :**

भारतीय ग्रामीण समुदायाचा बाह्य जगाशी फारच थोडा संबंध होता. पृथक स्वयंपूर्ण व एकाकी असे समाजजीवन हे भारतीय ग्रामीण समुदायाचे आगळे विशिष्ट्य आहे. Charles Metcalf म्हणतात, ग्रामीण समुदाय लहानशा संघराज्याच्या स्वरूपात आहेत. त्यांच्याजवळ त्यांच्या गरजांच्या पूर्तीची साधने पूर्ण असून बाह्य संबंधापासून ते पूर्णत: स्वतंत्र आहेत.

ग्रामीण समुदायात हा वेगळेपणा निर्माण होण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे या क्षेत्रातील अर्थव्यवस्था आहे. जीवनास आवश्यक असणाऱ्या निरनिराळ्या वस्तूचे उत्पादन ग्रामीण क्षेत्रात निरनिराळ्या जातींकडून होत असते. आर्थिकदृष्ट्या ग्रामीण क्षेत्रात निरनिराळ्या जातींकडून होत असे. आर्थिकदृष्ट्या ग्रामीण समुदाय हा स्वयंपूर्ण गट होता. आपल्या सर्वसाधारण गरजांच्या पूर्तीकरिता या समुदायास दुसऱ्या समुदायावर अवलंबून राहावे लागत नव्हते. धान्य, कापड व घरे बांधण्याकरिता लागणारे सामान त्या त्या समुदायातच उपलब्ध होत असे. त्याच्या गरजादेखील त्या काळात मर्यादितच होत्या.

मनोरंजन, शिक्षण व सामाजिक सुरक्षेचे कार्य कुटुंबसंस्था करीत होती. त्यासाठी इतरांवर अवलंबून राहावे लागत नव्हते. राजकीय क्षेत्रातदेखील जातीपंचायतींना व ग्रामपंचायतींना त्या विशिष्ट ग्रामीण क्षेत्राबाबत पूर्ण अधिकार देण्यात आले आहेत. राजा ग्रामीण क्षेत्राच्या कोणत्याच व्यवहारात ढवळाढवळ करीत नव्हता. घरे सडका, बाजार, स्मशानभूमी, देवळे, विहिरी, तलाव, कुरणे इत्यादी सर्व बाबींवर ग्रामप्रमुखाचे नियंत्रण असे. ग्रामपंचायती, ग्रामसंरक्षणाचे, न्यायदानाचे कार्य करीत. कर वसूल करून सरकारी खजिन्यात भरण्याचे कार्यदेखील त्याचेच होते. ग्रामपंचायती इतक्या शक्तीशाली होत्या की, राजाने कितीही कर बसविले तर त्यापैकी कोणते जनतेवर लागू करावेत. या बाबतचे अधिकार त्यांचे होते. अशा तऱ्हेने राजकीय क्षेत्रात एका स्वयंपूर्ण संस्थेच्या स्वरूपात ग्रामपंचायत व जातिपंचायत कार्य करीत असल्यामुळे या दृष्टीनेदेखील एका ग्रामीण समुदायाचा इतर क्षेत्रांशी फारच कमी संबंध येत होता.

ग्रामीण समुदायाच्या एकाकी स्वरूपाचे तिसरे महत्त्वाचे कारण म्हणजे वाहतूक संचारसाधनांचा अभाव हे आहे. आजच्या घटकेलादेखील भारतातील बरीचशी ग्रामीण क्षेत्रे वाहतूक साधनांनी परस्परांशी जोडलेले नाहीत. उपलब्ध असलेल्या बैलगाडीत या वाहतूक साधनाच्या साह्याने एका मर्यादित क्षेत्रात येणे-जाणे होत आहे. साधनांच्या अभावामुळे देखील ग्रामीण समुदाय इतर समुदायापासून वेगळे पडलेले दिसतात. तसेच शिक्षणाच्या अभावामुळे वर्तमानपत्रे, मासिके, रेडिओ या संदेशवाहक साधनांचादेखील विशेष प्रसार ग्रामीण क्षेत्रात झालेला नव्हता. त्यामुळे केंद्रात कोणाचे सरकार आहे. कोणत्या राज्यात कोण मुख्यमंत्री आहे. या प्रश्नात ग्रामीण क्षेत्रातील लोकांना विशेष रस नाही. त्यांचे गाव हेच त्यांचे विश्व होते. परंतु दिवसेंदिवस ही परिस्थिती बदलत आहे. समुदायात परिवर्तन होत आहे असे दिसते.

**४. कुटुंब अर्थव्यवस्था :**

भारतीय ग्रामीण क्षेत्रात कृषी हाच प्रमुख व्यवसाय आहे. एकूण लोकसंख्येच्या ७५ टक्के लोक प्रत्यक्षात शेतीवर अवलंबून आहेत व ५ टक्के लोक शेतीशी संबंधित असणाऱ्या इतर व्यवसायावर आपली उपजीविका करतात. महाराष्ट्रासारख्या औद्योगिकदृष्ट्या विकसित प्रांतातदेखील ६४ टक्के लोक शेती करतात. या व्यवसायाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे या व्यवसायातील मनुष्याचा संबंध जीवित व विकसित वस्तूंशी म्हणजे प्रत्यक्ष निसर्गाशी असतो.

ग्रामीण क्षेत्रातील बहुतेक सर्व लोक व्यवसायाने शेतकरी असले तरी आर्थिक दर्जा, त्यांच्या कामाचे स्वरूप, राहणी याबाबत भिन्नता असते. काही लोकांजवळ अधिक शेती असते, तर काहींजवळ कमी. काही लोकतर शेतमजुरी करूनच आपली उपजीविका करतात. तसेच ग्रामीण क्षेत्रात असेही काही लोक असतात की जे प्रत्यक्ष शेती करीत नाहीत. परंतु त्यांचा व्यवसाय शेतीशी संबंधित असतो. उदा. लोहार, सुतार, चांभार.

ग्रामीण क्षेत्रातील अर्थव्यवस्थेचा निर्वाही अर्थव्यवस्था (Substance Economy) म्हणून उल्लेख करता येईल. जीवनातील कमीतकमी व अनिवार्य गरजांची पूर्ती ही व्यवस्था करते. व्यवस्थेत सरळ सोप्या साधनांचा वापर केला जातो. या अर्थव्यवस्थेत समुदाय स्वयंपूर्ण असतो. भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्थेत ही सर्व वैशिष्ट्ये आढळतात. उपभोगाकरिता

उत्पादन हे तत्त्व निर्वाही अर्थव्यवस्थेत असते. परंतु बदलत्या परिस्थितीत ही वैशिष्ट्ये हळूहळू कमी होत आहेत. आज शेतकरी व्यापारी दृष्टी कोनातून शेती करताना दिसतो. ग्रामीण क्षेत्रात झालेला हा एक चांगला बदल म्हणावा लागेल..

**५. विशेषीकरणाचा अभाव :**

व्यवसाय विशेषीकरणाच्या कल्पनेस औद्योगिक प्रगती व नागरिक या पासूनच खऱ्या अर्थाने प्रारंभ झाला. नागरी क्षेत्रात एकाच व्यवसायाच्या अनेक भागात विशिष्ट लोकच कार्य करतात व त्याच क्षेत्रात ते प्रावीण्य मिळवितात. उदा. कापड तयार करणारे व मशीन दुरूस्त करणारे वगळे असे विशेषीकरण दिसते. परंतु ग्रामीण क्षेत्रात मात्र शेती हा एकच व्यवसाय असून या व्यवसायातील नांगरणे, पेरणे, मळणे या सर्व क्रिया एकच व्यक्ती करू शकते. प्रसंगी आपल्या अवजारांची दुरुस्तीदेखील तो स्वतःच करून घेईल. भारतीय ग्रामीण समुदायात अजून म्हणावा तितका यंत्रानी प्रवेश केलेला नाही. यामुळे परंपरागत पद्धतीच्या शेतातील सर्व क्रियांची माहिती एकाच व्यक्तीला असलेली दिसते. पण ज्यावेळी ट्रॅक्टर, मोटर पंप, मळणीची यंत्रिक साधने येतील त्यावेळी कदाचित विशेषीकरणाचा प्रसार याही क्षेत्रात होईल.

**६. सामाजिक एकरूपता :**

सामाजिक स्वरूपाच्या दृष्टीने ग्रामीण समुदायाची अवस्था आदिवासी जमाती व नागरीसमुदाय यांच्यामधील आहे. यात दोहोंचीही काही लक्षणे आढळतात. आदिवासी जमातीत आढळून येणारे सामाजिक एकरूपतेचे तत्त्व यात अधिक प्रमाणात व नागरी समुदायात आढळणारे सामाजिक विषमतेचे तत्त्व कमी प्रमाणात आढळते.

ग्रामीण समाज हा शेतकऱ्यांचा समाज असल्याने सर्व लोक एकाच व्यवसायात असतात. एकाच ठिकाणी बराच काळ वास्तव्य व इतर संस्कृतीचा कमी संबंध यामुळे सांस्कृतिक परंपरा रतिरिवाज, धार्मिक विश्वास, नीती अनीतीच्या कल्पना, भाषा, सण या सर्व बाबतीत त्यांच्यात एकरूपता निर्माण झालेली दिसते. व्यवसाय समान असल्यामुळे व्यवसायातील सुख-दुःखे देखील समान असतात. नगराप्रमाणे भिन्न ठिकाणचे, भिन्न जातीचे व धर्माचे लोक येथे येऊन स्थायिक होत नाहीत. त्यामुळे ग्रामीण समाजजीवनात एकरूपता दिसते.

**७. सामाजिक गतिशीलतेचा अभाव :**

समाजशास्त्रात गतिशीलता म्हणजे स्तरीकरणाच्या व्यवस्थेत गती किंवा स्थितीमध्ये परिवर्तन. जर या गती किंवा स्थितीमधील या परिवर्तनाचे दर्जा व भूमिकेत बदल होत असेल, पण सामाजिक वर्गाच्या दर्जाच्या स्थितीत परिवर्तन होत नसेल तर त्यास समस्तरीय Horizontal परिवर्तनशीलता असे म्हणतात. जर या पद व भूमिकेतील परिवर्तनाने सामाजिक वर्गाच्या स्थितीत परिवर्तन होत असेल, तर या परिवर्तनशीलतेस किंवा गतिशीलतेस (vertical) विषमस्तरीय गतिशीलता असे म्हणतात.

गतिशीलतेच्या वरील व्याख्येवरून असे दिसते की, परिवर्तनाच्या बाबतीत ग्रामीण व नागरी क्षेत्रात फार मोठे अंतर आहे. ग्रामीण क्षेत्रात ही गतिशीलता अतिशय कमी आहे. कुटुंबाचा जो व्यवसाय असेल तोच पिढ्यान्पिढ्या सुरू असतो व त्या व्यवसायानुसार मिळणारा दर्जादेखील तसाच कायम असतो. जातीनुसार किंवा जन्मानुसार व्यवसाय व सामाजिक

दर्जा हा आधार असल्याने गतिशीलता कमी दिसते. या उलट नागरी क्षेत्रात मात्र संपत्ती, कौशल्य, बुद्धी यांच्या आधारावर सामाजिक दर्जा मिळत असल्याने पद किंवा दर्जा बदलविणे सोपे असते. तसेच सामाजिक प्रक्रियेचा हा नियम आहे की, सामाजिक व सांस्कृतिक वातावरणात जेव्हा परिवर्तन होतात तेव्हा ऊर्ध्वमुखी (Vertical)गतिशीलतेचे अनेक मार्ग मोकळे होतात. नागरी क्षेत्रापेक्षा ग्रामीण क्षेत्रात सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तन अतिशय मंद आहे. त्यामुळे गतिशीलतेला विशेष संधी नाही.

क्षेत्रीय परिवर्तनाची गतीदेखील ग्रामीण क्षेत्रात कमीच आहे. ग्रामीण समुदाय बऱ्याच प्रमाणात स्वयंपूर्ण असल्याने व परंपरागत शेती हा व्यवसाय असल्यामुळे व्यवसायाच्या निमित्ताने किंवा व्यवसाय शोधण्यासाठी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्याची प्रवृत्ती ग्रामीण क्षेत्रात कमीच दिसते.. तसेच कुटुंबाच्या बंधनात व्यक्ती इतकी बांधली गेली असते की आपले कुटुंब सोडून दूर जाण्याची कल्पना तिला सहनदेखील होत नाही. या उलट नागरी क्षेत्रात व्यवसाय व व्यापारानिमित्त व्यक्ती एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यास सहज तयार होते.

**८. बलुतेदारीची व्यवस्था :**

भारतीय समाजजीवनात जातिव्यवस्थेत महत्त्वाचे स्थान आहे. त्यामुळे जातिव्यवस्थेवर आधारित बलुतेदारी व्यवस्थादेखील भारतीय ग्रामीण समुदायात महत्त्वाची मानली जाई. इतकेच नव्हे तर भारतीय ग्रामीण समुदायाचे हे आगळेच वैशिष्ट्य आहे. या व्यवस्थेचे स्पष्टीकरण करताना ऑक्सर लेबिस म्हणतात, "या व्यवस्थेमध्ये गावातील प्रत्येक जातिसमूहाकडून अशी अपेक्षा केली जाते की, ते दुसऱ्या जातिकुटुंबाची नियोजित सेवा करतील. या प्रथेनुसार एका विशिष्ट समुदायात राहणाऱ्या विभिन्न जातींच्या लोकांनी इतर जातींची काही प्रमाणिक सेवा करावी व या सेवेच्या मोबदल्यात इतर जातींनी त्यांच्या उदरनिर्वाहाची व्यवस्था करावी. उदा. सोनार दागिने तयार करीत, लोहार शेतीसाठी लोखंडी अवजारे, सुतार लाकडी अवजारे तयार करीत व त्यांच्या मोबदल्यात यजमानाकडून वर्षातून एकदा किंवा दोनदा धान्याच्या स्वरूपात नियोजित मोबदला घेत असत. सेवा करणाऱ्यांना बलुतेदार असे म्हणत. जातीतील प्रत्येक कुटुंबास काही घरे वाटून दिलेली असत व पिढ्यान्पिढ्या ते त्यांची सेवा करीत असत. सेवा करण्याचा हा अधिकार मालमत्तेसारखा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीस मिळत असे. पित्यांच्या मृत्यूनंतर सेवेचे अधिकार मुलांना मिळत. हिस्से वाटणीच्या वेळी यजमान कुटुंबाचीदेखील वाटणी होई. एखाद्या कुटुंबास एकच मुलगी असल्यास ते अधिकार मुलीच्या पतीस मिळत. आपले बलुतेदारीचे अधिकार बलुतेदार विकूदेखील शकत होता. अशा रीतीने सेवा करणे व सेवा घेणे हा अधिकार मानला जाई. स्वत:च्या इच्छेनुसार बलुतेदार एखाद्या कुटुंबाची सेवा नाकारू शकत नव्हता किंवा बलुतेदारास काढू शकत नव्हता त्यावर जातीपंचायतीचे नियंत्रण होते. अशा रीतीने या प्रथेने ग्रामीण क्षेत्रातील सहजाती परस्पर अधिकार कर्तव्याच्या (Mutual obligation) जाणिवेने एकमेकांशी बांधल्या होत्या.

सामाजिक सुरक्षा उत्तरदायित्वपूर्ण सामाजिक बंधन, कमीतकमी व्यावसायिक स्पर्धा, सामाजिक नियंत्रणाचे प्रभावी साधन हे या प्रथेचे काही गुण सांगता येतील. परंतु परिवर्तनाच्या ओघात जेव्हा उच्चजातींना या प्रथेच्या नावाखाली कनिष्ठ जातींची पिळवणूक

सुरू केली तेव्हा परस्पर सहकार्याच्या उद्देशाने सुरू झालेली ही प्रथा समाजात जाचक ठरली. बदललेल्या सामाजिक परिस्थितीत तिचे प्रयोजनदेखील उरले नाही. त्यामुळे आज ही प्रथा जवळजवळ नष्ट पावल्यासारखीच आहे.

**९) जनमताचे अधिक महत्त्व :**

ग्रामीण समुदाय आकाराने लहान असतो. त्यातील सदस्यांची संख्या मर्यादित असते व सर्व सदस्य एकमेकांना प्रत्यक्ष ओळखणारे असतात. थोडक्यात म्हणजे हा समुदाय प्राथमिक समूहाच्या स्वरूपात आपले जीवन व्यतीत करतो. व्यक्तिजीवनाच्या प्रत्येक अंगाशी समूहाचा प्रत्यक्ष संबंध असल्यामुळे ग्रामीण समुदाय जनमताचा विशेष आदर केला जातो. गावातील वृद्धांच्या व सर्वसाधारण जनतेच्या मताच्या विरुद्ध जाऊन कोणतेही कार्य करण्यास व्यक्ती धजत नाही. प्राथमिक स्वरूपाची नियंत्रणशक्ती ग्रामीण समुदायात आढळून येते. जातिपंचायतीच्या किंवा ग्रामपंचायतीच्या शिक्षेची, शेजाऱ्यांच्या निंदेची सर्वांना भीती वाटत असते, कारण राज्याच्या न्यायालयात झालेल्या शिक्षेपेक्षा ही शिक्षा जीवघेणी वाटते.

**१०) धर्म, रूढी व परंपरांचा अधिक प्रभाव:**

नागरी क्षेत्रापेक्षा ग्रामीण समाजावर धर्म, रूढी व परंपरांचा अधिक पगडा असलेला दिसतो. ग्रामीण समाजात धर्माच्या बाबतीत तर्कापेक्षा श्रद्धेलाच अधिक महत्त्व आहे. धर्माचे स्वरूप परंपरेने व संस्कृतीचा वारसा म्हणून त्यांच्याकडे जसे चालत आले तसेच ते दिसते. सत्य-असत्य किंवा योग्य अयोग्यतेची शहानिशा करण्याची त्यांना गरज वाटत नाही. देवदेवतांबाबतच्या त्यांच्या कल्पना मानवीकृत Anthropomorphic आहेत. आदिवासी समाजात आढळून येणारी आत्मवादाची जादुटोण्याची कल्पना भारतीय ग्रामीण नैसर्गिक आपत्तीच्या क्षेत्रात आजही धर्माचे एक अंग ठरले आहे. आजच्या विशाल युगातदेखील नैसर्गिक आपत्तीच्या वेळी ईश्वराकडे धाव घेण्याची, धार्मिक अनुष्ठाने करण्याची प्रवृत्ती ग्रामीण क्षेत्रात दिसते. पूजाअर्चा,

भारतातील ग्रामीण क्षेत्रात प्रामुख्याने हिंदू, मुसलमान व बौद्ध धर्माचे लोक राहतात. परंतु धार्मिक उत्सवांच्या वेळी हे सर्व लोक एकसाथ भाग घेताना दिसतात. धर्माने हिंदू असून मुसलमान पीर, दर्गा यांच्यापुढे नवस करणाऱ्यांची संख्या आजही कमी नाही किंवा हिंदुदेवतांच्या पालखीकरिता दरवर्षी काही करून देणारे मुसलमान पुजारीदेखील कमी नाहीत. भारतीय ग्रामीण समुदायावर धर्मांचा एवढा प्रभाव असण्याचे मुख्य कारण म्हणजे पूर्णत: निसर्गावर अवलंबून असणारा त्यांचा शेतीचा व्यवसाय, ऊन, पाऊस, वादळ या निसर्गाच्या खेळाबरोबर त्यास प्रत्यक्ष सामना करावा लागतो. ग्रामीण व्यक्तीच्या धार्मिक प्रवृत्तीचे स्पष्टीकरण मॅक आयव्हर (Mac iver) यांनी मोठ्या मार्मिक रीतीने केले आहे. शेतकरी निसर्गाकडे कलाकाराच्या सौंदर्यात्मक दृष्टिकोनातून पाहत नाही किंवा वैज्ञानिकाच्या चिकित्सक दृष्टिकोनातून त्यामागील रहस्याचा शोध घेण्याचा तो प्रयत्न करीत नाही, तर निसर्गाकडे तो मित्र किंवा शत्रू, धान्य पिकविणारा, पाऊस पाडणारा किंवा वादळ, पूर आणणारा या दृष्टिकोनातून पाहतो. मॅक्स स्पूलरच्या मते भारतात इंद्र, वरूण सूर्य, चंद्र इत्यादींना देवता मानून त्यांची पूजा करण्याचे कारणदेखील हेच आहे.

**११. ग्रामीण कला :**

भारतीय ग्रामीण कलेवरदेखील धर्म, निसर्ग व कुटुंबांचा बराच प्रभाव असलेला दिसून येतो. ग्रामीण समुदायात त्यांची चित्रकला, मूर्तिकला, लोकगाथा, नृत्य, नाटक आदी सर्वच त्यांच्या धार्मिक विश्वासास अनुकूल असेच असतात. कलेच्या क्षेत्रात नागरी क्षेत्राप्रमाणे एखादी व्यक्तीच नव्हे तर सर्व कुटुंबच्या कुटुंबच प्रसिद्ध असते. ग्रामीण कला त्यांच्या साध्या व सरळ जीवनाचे खऱ्या अर्थाने प्रतिनिधित्व करते. उदा. संगीताच्या क्षेत्रात वापरली जाणारी उपकरणे अगदी साधी व गावातल्या कारागिरांनी बनविलेली असतात. नाटके उघड्या मैदानात होतात व जागादेखील फुले, पाने, पिसे या नैसर्गिक साधनांनीच शृंगारलेली असते. निरनिराळी लोकगीते किंवा नृत्यगीतेदेखील लावणी, कापणी, मळणीच्या वेळची किंवा ऋतूंशी संबंधित अशीच असतात. त्यात नागरी कवीचे शब्दांचे अवडंबर नाही तर साधी भाषा, सरळ व सोपे भाव त्यात दिसतात. उपमा आदी अलंकार असले तरी तेदेखील पाने, फुले, फळ, नदी, ओढा या नैसर्गिक बाबींशी संबंधित असेच असतात.

**१२. स्त्रियांचा निम्न सामाजिक दर्जा :**

पूर्वीच्या काळी भारतीय ग्रामीण समाज स्त्रीचा दर्जा पुरूषांच्या तुलनेत निम्न प्रतीचाच होता. पिवृसत्तात्मक कुटुंबव्यवस्था असल्याने सर्व अधिकार पुरुषांच्या हातीच केंद्रित झाले होते. कोणत्याही व्यवहारात स्त्रीचे मत घेतले जात नसे. तिच्या मताला किंमतदेखील नव्हती. तिचे क्षेत्र मुलांचे पालनपोषण व घरगुती कामापुरतेच मर्यादित होते. बालविवाहाची प्रथा रूढ होती. समज येण्याअगोदरच तिचा विवाह होत असे. जोडीदाराच्या निवडीबाबतदेखील तिचे मत घेतले जात नसे. स्त्रियांना शिक्षण नसे. ती पूर्ण अंशाने पुरूषावर अवलंबून होती. आज त्यात बरेच बदल होत आहेत.

**१३. निम्न शैक्षणिक व आर्थिक दर्जा :**

भारतीय ग्रामीण समुदायात शिक्षणाचा अभावच आहे. भारतीय शालेय शिक्षणाचा प्रसार इंग्रजी आमदानीतच झाला व तोदेखील नागरी क्षेत्रातच. ग्रामीण क्षेत्राची शैक्षणिक प्रगती करण्याचे प्रयत्न स्वातंत्र्योत्तर काळात होत आहेत, परंतु त्यास म्हणावे तितके यश लाभले नाही.

भारतीय ग्रामीण जनतेचा आर्थिक दर्जादेखील निकृष्ट आहे. तिरांसाठी धान्य पिकवणारा शेतकरी स्वतः अर्धपोटी राहतो. ग्रामीण क्षेत्रातील या निर्धनतेचे प्रमुख कारण म्हणजे शेतीचे मागसलेले तंत्र आहे. इतर देशाबरोबर भारतीय ग्रामीण समाजाच्या दरडोई वार्षिक उत्पन्नाचा अभ्यास केला असता हे उत्पन्न अतिशय मर्यादित असल्याचे दिसून येते. महाराष्ट्र राज्यात कोकण किनारपट्टीतील जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न तर फारच अल्प असल्याचे दिसून येते. त्याचे कारण भारतातील बहुसंख्य ग्रामीण भागातील शेतकऱ्याना नवीन तंत्रांचे ज्ञान नाही. शेतीत लावायला भांडवल नाही. ओलिताची सोय नाही व त्यामुळे शेती पूर्णतः निसर्गावर अवलंबून आहे. जमीनदार, सावकारशाही ह्यासारख्या प्रथांमुळे देखील भारतीय शेतकरी अधिक निर्धन व कर्जबाजारी झालेले आहे.

**१४. साधे व प्रामाणिक जीवन :**

ग्रामीण समाजामध्ये अजूनही बहुसंख्य ठिकाणी पारंपरिक शेती तंत्राचाच वापर केला जातो. तंत्रज्ञानाचा अवलंब केला जात नाही. त्यामुळे शेती व्यवसायातून जेमतेम उत्पन्न मिळते. अंधश्रद्धा, निरक्षरता, वेठबिगारी, देवभोळेपणा इ. कारणांमुळे या समाजाच्या प्रगतीमध्ये मोठे अडसर निर्माण झाले आहेत. अतिशय मर्यादित उत्पन्नामध्ये लोकांना जीवन जगावे लागत आहे. प्राथमिक संबंधांची तीव्रता अधिक असल्याने आपला समाज व आपले कुटुंब यांच्याशी प्रामाणिक राहण्याची शिकवण त्यांना प्रथमपासून दिली जाते.

**१५. नैसर्गिक वातावरणाचा प्रभाव :**

शेती प्रधानतेमुळे ग्रामीण लोकांचा निसर्गशक्तीशी जवळचा संबंध येतो. ग्रामवासीयांच्या दैनंदिन जीवनावर नैसर्गिक पर्यावरणाचा प्रभाव असलेला दिसून येतो. हे लोक निसर्गशक्तीशी सामना करत असलेले आढळतात. या संघर्षात त्यांना कित्येकदा हारही पत्करावी लागते. त्यामुळे त्यांच्या मनात दैवीशक्तीचे श्रेष्ठत्व निर्माण झालेले दिसून येते. प्रतिकूल नैसर्गिक परिस्थितीशी नेहमीच मुकाबला करण्याचा प्रसंग त्यांच्यावर येत असल्याने निसर्गशक्तीशी संघर्ष करण्याऐवजी त्या शक्तीला शरण जाणे ते अधिक पसंत करतात. निसर्गतः निर्माण झालेल्या वनस्पतीची फळे चाखणे, कंदमुळे संकलित करणे, औषधी वनस्पतीपासून विविध प्रकारची औषधे बनविणे हे लोक पसंत करतात. काही वृक्षांना देव मानणे, त्यांची भक्तिभावे पूजा करणे याही गोष्टींना प्राधान्य देण्यात आलेले दिसून येते.

वरील विवेचनावरून हे स्पष्ट होते की, भारतीय ग्रामीण जीवनाची स्वत:ची काही वेगळी वैशिष्ट्ये आहेत. जी इतर देशांत आढळत नाहीत. निम्न शैक्षणिक व आर्थिक दर्जा, तसेच स्त्रियांची निकृष्ट अवस्था असली तरी ग्रामीण कौटुंबिक जीवन मात्र अधिक स्थिर व समाधानी आहे.

## १.५ सारांश

बहुतांशी ग्रामीण समाज आर्थिक विकासापासुन वंचित आहे. म्हणून ग्रामीण विकासाचा अर्थ, ग्रामीण विकासाचे स्वरुप, व्याप्ती, ग्रामीण विकासाचे महत्त्व, ओळख इत्यादी घटकांचा आढावा या प्रकरणात घेतला आहे. ग्रामीण समाजाच्या समस्या जाणून घेऊन त्या दृष्टिने विविध कार्यक्रमांची आखणी करणे आवश्यक आहे.

भारताच्या आर्थिक विकासात ग्रामीण विकासाला महत्त्वाचे स्थान आहे. ग्रामीण विकास म्हणजे खऱ्या अर्थाने देशाचा विकास होय. ब्रिटीश राजवटीपूर्वी ग्रामीण समाज स्वयंपूर्ण व स्वायत्त होता. गावाचा कारभार, गावचे अनुभवी पंच चालवत होते. ब्रिटीश राजवटीत स्वयंपूर्ण खेड्यांची अर्थव्यवस्था संपुष्टात आली आणि ग्रामीण भागात अनेक समस्या निर्माण झाल्या. स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण विकासाचे प्रयत्न सुरु झाले. ग्रामीण विकासाची उद्दीष्ट्ये निश्चित करण्यासाठी ग्रामीण विकासाची संकल्पना, ग्रामीण विकासाचे स्वरुप, ग्रामीण विकासाची व्याप्ती इ. घटक लक्षात घेऊन उद्दीष्ट्ये मांडण्यात आली आहेत. ग्रामीण विकासासाठी आर्थिक विकास यांचा संबंध जोडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

## १.६ प्रश्न

१) ग्रामीण विकासाची व्याख्या सांगून संकल्पना स्पष्ट करा.

२) ग्रामीण विकासाचे स्वरुप व व्याप्ती विशद करा.

३) ग्रामीण अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

## १.७ संदर्भ


- आगलावे प्रदिप, “ग्रामीण आणि नागरी समाजशास्त्र”, साईनाथ प्रकाशन, नागपुर.
- नाडगोंडे गुरुनाथ, “ग्रामीण समाजशास्त्र”, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे.
- कुरुळकर र. पु.,“विकासाचे अर्थशास्त्र”, विद्या प्रकाशन – नागपुर.


❖❖❖❖

# २

# ग्रामीण विकासाचे परिचयात्मक पैलू – २

**घटक रचना :**

२.० उद्दिष्टे

२.१ प्रस्तावना

२.२. ग्रामविकासाची उद्दिष्टे

२.३ ग्रामीण विकासाचे महत्व

२.४. भारतातील ग्रामीण विकासाच्या समस्या

२.५ प्रश्न

## २.० उद्दिष्टे

- ग्रामीण विकासाची उद्दिष्टे समजून घेणे.
- ग्रामीण विकासाचे महत्त्व जाणून घेणे.
- भारतातील ग्रामीण विकासाच्या समस्यांचा अभ्यास करणे.

## २.१ प्रस्तावना

ग्रामीण विकासाची व्याख्या खेड्यातील लोकांच्या अर्थव्यवस्था आणि सामाजिक कल्याण आणि ते राहत असलेल्या संस्थात्मक आणि भौतिक वातावरणातील एकंदर सुधारणा म्हणून केली जाते. जागतिक बँकेच्या मते, 'ग्रामीण विकास हे लोकांच्या विशिष्ट गटाचे - ग्रामीण गरीबांचे आर्थिक आणि सामाजिक जीवन सुधारण्यासाठी तयार केलेले धोरण आहे. थोडक्यात, ग्रामीण विकास ही ग्रामीण भाग, ग्रामीण लोक आणि ग्रामीण जीवनमान सुधारण्याची प्रक्रिया आहे.

या प्रकरणामध्ये आपण ग्रामीण विकासाची उद्दिष्ट्ये, ग्रामीण विकासाचे महत्व आणि भारतातील ग्रामीण विकासाच्या समस्या या बाबींचा सविस्तर अभ्यास करणार आहोत.

## २.२ ग्रामविकासाची उद्दिष्टे

ब्रिटीश राजवटीत भारतातील स्वयंपूर्ण खेड्यांचा -हास झाला, आणि अनेक समस्या ग्रामीण भागात निर्माण झाल्या. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत सरकारने नियोजनाचा स्वीकार करुन

ग्रामीण विकास कार्यक्रमांवर विशेष भर दिला. कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यापूर्वी ग्रामीण विकासाची काही उद्दीष्ट्ये ठरविण्यात आली ती उद्दीष्ट्ये पुढीलप्रमाणे :-

**१) कृषी उत्पादनात वाढ करणे** :

देशातील एकूण लोकसंख्येपैकी ६४.५% लोकसंख्या प्रत्यक्ष शेतीवर अवलंबून आहे. मोठी लोकसंख्या शेतीवर अवलंबून असल्यामुळे शेतीचा विकास साधून कृषी उत्पादनात वाढ करणे आवश्यक आहे. त्यासाठी शेतीच्या सुधारित तंत्राचा वापर करणे, शेतीसाठी कर्ज उपलब्ध करुन एकरी उत्पादकता वाढविणे हे ग्रामीण विकासाचे महत्त्वाचे उददीष्ट आहे.

**२) संशोधन व प्रशिक्षण सुविधा :**

कृषी विकासासाठी शेतकी संशोधन केंद्र, कृषी विद्यापीठ, कृषी महाविदयालये यांची स्थापना करणे, संशोधनाच्या माध्यमांतून अधिक उत्पादन देणाऱ्या पिकांच्या जाती शोधून काढ व त्याची माहिती ग्रामीण भागात प्रसारीत करण्यासाठी प्रशिक्षणाच्या सुविधा निर्माण करणे, कृषी विस्तार सेवा विकसित करणे व त्याच बरोबर शेती पुरक व जोड व्यवसाय विकसित करण्याच्या दृष्टिने सतत प्रयत्न करणे, नवनवीन तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहचविणे व त्याचा अवलंब करण्यासाठी त्यांना प्रवृत्त करणे हे ग्रामीण विकासाचे उद्दिष्ट्य आहे.

**३) प्रक्रिया उद्योगांचा विकास :**

शेतमालावर प्रक्रिया करणारे उद्योग हे बहुतांशी शहरी भागात विकसित झाले आहेत. ग्रामीण भागात प्रक्रिया उद्योग नसल्यामुळे शेतकऱ्यांना उत्पादित कच्चा माल कमी किंमतीत विकावा लागतो. अशा कच्च्या मालाला योग्य किंमत मिळत नाही त्यामुळे शेतकऱ्यांना आपली आर्थिक परिस्थिती सुधारता येत नाही. म्हणून शेतमालाला योग्य किंमती मिळवून देण्यासाठी, ग्रामीण भागात अधिक रोजगार निर्मीती करण्यासाठी ग्रामीण भागात प्रक्रिया उद्योगांचा विकास करण्याचे उद्दीष्ट ग्रामीण विकासात ठेवण्यात आले आहे.

**४) जोड व्यवसायांचा विकास :**

देशातील एकूण शेत जमिनीपैकी ७७% क्षेत्र कोरडवाहू स्वरुपाचे आहे. त्यामुळे वर्षातील आठ महिने ग्रामीण भागात पुरेसा रोजगार उपलब्ध होत नाही. म्हणून शेतीशी निगडीत जोड व पुरक व्यवसायांच्या विकासाचे उद्दीष्ट ठेवून त्या माध्यमातून ग्रामीण भागात रोजगार निर्मीती करण्याचे प्रयत्न केले जात आहेत.

**५) सहकाराच्या माध्यमातुन दुर्बल घटकांचा विकास :**

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे संघटन करणे, छोटे शेतकरी, सीमांत शेतकरी, छोटे व्यावसायिक, श्रमिक यांचे शोषण थांबविण्यासाठी सहकारी संस्था स्थापन करणे, आधुनिक तंत्राचे फायदे मिळविण्यासाठी सहकाराच्या माध्यमातून उद्योगांचा विकास साधणे, सहकारी पतसंस्थांची स्थापना करुन सावकारांकडून शेतकऱ्यांची होणारी पिळवणूक थांबविणे, सहकाराच्या माध्यमातुन दुर्बल घटकांचे सबलीकरण करण्याचे उद्दीष्ट ग्रामीण विकासात ठेवण्यात आले आहे.

**६) मुलभूत गरजांची पूर्तता :**

ग्रामीण जनतेच्या सर्वांगीण विकासासाठी किमान गरजांची पूर्तता करता यावी म्हणून अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य, शुद्ध पिण्याचे पाणी, ग्रामीण विद्युतीकरण इत्यादी सुविधा उपलब्ध करुन देऊन मानवी संपत्तीच्या विकासाला पोषक वातावरण निर्माण करणे.

**७) ग्रामीण जनतेच्या उन्नतीसाठी स्वयंरोजगाराच्या योजना राबविणे, ग्रामीण युवकांसाठी स्वयंरोजगार :**

प्रशिक्षण सुविधा निर्माण करणे, दुर्बल घटकांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन देणे, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना विकास प्रक्रियेत सामावून घेणे व त्यांचे दारिद्र्य निर्मुलन करणे.

**८)** ग्रामीण जनतेच्या मनामध्ये देशभक्ती, समानता, ऐक्य, बंधुभाव, राष्ट्रीय एकात्मकता निर्माण करणे, जातीभेद, धार्मिक भेद, प्रांत वाद या गोष्टींना दुर ठेवण्याच्या दृष्टिने समाजात जनजागृती करणे.

**९)** ग्रामीण जनता व नागरी जनता यांच्यातील अंतर कमी करणे. ग्रामीण आणि शहरी संस्कृतीची सांगड घालण्याचा प्रयत्न करणे. ग्रामीण औदयोगिकीकरणावर भर देणे.

**१०)** ग्रामीण जनतेचे जीवनमान उंचावणे, त्यांचा राहणीमानाचा दर्जा सुधारणे यासाठी उत्पन्नाची साधने देणे, घरगुती स्वरुपाच्या साधन सामग्रीमध्ये विकास घडवून आणणे.

**११)** ग्रामीण जनतेमधील अंधश्रद्धा दुर करुन त्यांना विज्ञाननिष्ठ दृष्टी प्राप्त करुन देणे. स्वकर्तृत्त्वाने आपला विकास घडवून आणण्याची जाणीव करुन देणे. अनिष्ट प्रथा, परंपरा यांच्यापासुन ग्रामीण समाजाला दुर ठेवणे.

**१२)** स्थानिक पातळीवर रोजगार निर्मीतीचे कार्यक्रम राबविणे आणि रोजगार निर्मीतीतून उत्पादक स्वरुपाची मालमत्ता निर्माण करणे.

## २.३ ग्रामीण विकासाचे महत्व

ग्रामीण विकास घडवून आणण्यासाठी ग्रामीण समाजाचा शास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास होणे महत्त्वाचे आहे. या माध्यमातुन ग्रामीण समाजाच्या सर्व समस्या जाणून घेता येतील आणि समस्या सोडविण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करता येतील.

ग्रामीण विकासाच्या संदर्भात महात्मा गांधीजींनी व्यक्त केलेले विचार अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. भारत हा खेड्यांचा देश आहे आणि जोपर्यंत खेड्यांचा पर्यायाने ग्रामीण भागाचा विकास होत नाही तोपर्यंत देशाचा खऱ्या अर्थाने विकास झाला असे म्हणता येणार नाही. देशाच्या एकूण भौगोलिक क्षेत्रापैकी ८० टक्केहून अधिक क्षेत्र ग्रामीण स्वरुपाचे आहे. म्हणजेच अधिक लोकसंख्या आणि सर्वाधिक भौगोलिक क्षेत्राचा विकास झाल्याशिवाय देशाचा विकास झाला असे म्हणता येणार नाही. भारताच्या संविधानात न्याय आणि समतेची उद्दीष्ट्ये स्वीकारलेली आहेत. या उद्दीष्ट्यांच्या पूर्ततेसाठी ग्रामीण भागातील लोक

समुदायाच्या अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्य या किमान गरजांची पूर्तता होणे आवश्यक आहे.

ग्रामीण भागात बहुसंख्य लोकसमुदायाने दारिद्र्यरेषेखाली जीवन जगणे आणि शहरी भागात वाढणारी समृद्धी ही विषमता दुर करण्यासाठी ग्रामीण विकासास अग्रक्रम देणे गरजेचे आहे याची जाणीव योजनाकार आणि राज्यकर्त्यांना झाली आहे. सहाव्या पंचवार्षिक योजनेपासून ग्रामीण विकासासाठी अधिक आर्थिक तरतुद करण्यात आली आणि ग्रामीण विकासाचे व्यापक कार्यक्रम राबविण्यास सुरुवात झाली. त्यामुळे ग्रामीण विकास प्रक्रियेला चालना मिळाली. तरीदेखील ग्रामीण समाजाच्या संपूर्ण समस्यांचे निर्मुलन झाले नाही.

ग्रामीण भाग सर्व अर्थाने स्वयंपूर्ण झाला, तरच खऱ्या अर्थाने ग्रामीण विकास होईल. ग्रामीण भागात राहणाऱ्या सर्वसामान्य जनतेचा विकास होईल आणि देशांच्या आर्थिक विकासाला चालना मिळू शकेल म्हणून ग्रामीण विकास महत्त्वाचा आहे.

## २.४ भारतातील ग्रामीण विकासाच्या समस्या

ग्रामीण भागात 1) लोक, 2) शेती, 3) पायाभूत सुविधा, 4) अर्थव्यवस्था, 5) समाज आणि संस्कृती, 6) नेतृत्व आणि 7) प्रशासनाशी संबंधित अनेक समस्या आहेत.

ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या समस्या खालीप्रमाणे चर्चिल्या आहेत.

**1. लोकांशी संबंधित समस्या:**

व्यक्ती आणि त्यांच्या राहणीमानाशी संबंधित समस्यांमध्ये निरक्षरता, तांत्रिक ज्ञानाचा अभाव, कमी आत्मविश्वास, भावना आणि विश्वासांवर अवलंबून राहणे इ.

**2. शेतीशी संबंधित समस्या:**

### 4. प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजना:

प्रत्येकाला घरे देण्याचा या योजनेचा उद्देश आहे. या योजनेची सुरुवात 1985 मध्ये झाली. 20 लाख गृहनिर्माण युनिट्स बांधण्याचा त्यांचा मानस होता, त्यापैकी 13 लाख ग्रामीण भागात असतील. ही व्यक्तींना निवासस्थान बांधण्यासाठी कमि व्याज वित्तपुरवठा करणारी योजना होती. याची सुरुवात 1999-2000 मध्ये झाली. या प्रकल्पाला 1999-2000 मध्ये 1438.39 कोटी मिळाले आणि अंदाजे 7.98 लाख युनिट्स विकसित झाली. 2000-01 मध्ये या प्रकल्पासाठी 1710.00 कोटींचा सरकारी खर्च होता. यायोजनेने ग्रामीण भागातील आरोग्य, प्राथमिक शिक्षण, पिण्याचे पाणी, घरे आणि रस्त्यांची स्थिती सुधारली आहे.

### 5. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार (MNREGA):

7 सप्टेंबर 2005 रोजी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा (MGNREGA) अधिसूचित करण्यात आला. मनरेगा हा जगातील सर्वात मोठा रोजगार कार्यक्रम ठरला आहे. स्कोप, आर्किटेक्चर आणि फोकसच्या बाबतीत हे पूर्वीच्या कोणत्याही सशुल्क रोजगार कार्यक्रमापेक्षा वेगळे आहे. यात एक अद्वितीय आणि अतुलनीय बॉटम-अप, लोक-केंद्रित, मागणी-चालित, स्वयं-निवडक, अधिकार-आधारित डिझाइन आहे.

मनरेगा कायदेशीर अधिकार म्हणून देय कामाची हमी देते. हा एक मागणी-चालित कार्यक्रम आहे ज्यामध्ये मजुरीच्या मागणीनुसार रोजगाराची तरतूद केली जाते. मागणीनुसार काम देण्यास असमर्थता आणि पूर्ण झालेल्या मजुराचा मोबदला देण्यास विलंब अशा दोन्ही परिस्थितींमध्ये भत्ते आणि नुकसान भरपाईसाठी कायदेशीर तरतुदी आहेत. हा जगातील सर्वात मोठा सामाजिक सहाय्य कार्यक्रम आहे. मागील दहा वर्षांत या उपक्रमावर 3.14 लाख कोटी रुपये खर्च झाले आहेत. एकूण 1980 दशलक्ष व्यक्ती-दिवसांच्या रोजगाराची निर्मिती झाली. या उपक्रमामुळे लाखो ग्रामस्थ निःसंशयपणे ग्रामीण गरिबीतून बाहेर आले आहेत.

"समाजातील उत्पन्न, संधी आणि फायद्यांच्या वितरणाच्या दृष्टीने न्याय" हे सामाजिक न्यायाचे वर्णन कसे केले जाते. हे वारंवार संस्था किंवा सेवांद्वारे पूर्ण केले जाते ज्याचा उद्देश सामाजिक सहकार्याच्या फायद्यांमध्ये प्रत्येकाला समान प्रवेश मिळावा आणि सामाजिक-आर्थिक असमानता देखील रोखता येईल.

एखाद्या राज्याचा कारभार पाहणाऱ्या व्यक्तींच्या संग्रहापासून सरकार बनलेले असते. परिणामी, प्रत्येक देशाच्या सरकारने समुदायाच्या वाढीच्या हितासाठी शहाणपणाने वागले पाहिजे. समाज कल्याण हे एक धोरण आहे जे समाजाच्या सर्वांगीण कल्याणावर लक्ष केंद्रित करते. सामाजिक कल्याण आणि आर्थिक समानता प्रदान करण्यासाठी या बदलांचा परिणाम म्हणून सरकार अनेक कार्यक्रम राबवते.

### प्रगती तपासा:

1. क्षेत्र विशिष्ट कार्यक्रमांतर्गत सुरू केलेल्या विविध विशिष्ट योजनांची नावे लिहा.
2. ग्रामीण विकासाच्या लक्ष्य समूहाभिमुख दृष्टिकोनावर चर्चा करा.
3. ग्रामीण विकासाच्या सामाजिक न्याय दृष्टिकोनासह आर्थिक विकासांतर्गत सुरू करण्यात आलेल्या विविध योजनांची नावे लिहा.

## ४.६ सारांश

विभागीय विभागणीच्या दृष्टिकोनातून हे कार्यक्रम सुरू करण्यात आले. विविध क्षेत्रातील विविध समस्या लक्षात घेऊन देशभर एकच कार्यक्रम राबविण्याऐवजी विविध क्षेत्रांसाठी वैयक्तिक कार्यक्रम सुरू करण्यात आले आणि त्याद्वारे ग्रामीण भागातील समस्यांचे निराकरण करण्यात आले. ग्रामीण विकासाचा सहभागात्मक दृष्टीकोन ही स्थानिक लोकसंख्येला विकास प्रकल्पांमध्ये सहभागी करून घेण्याची प्रक्रिया आहे. ग्रामीण विकासाचा क्षेत्र विशिष्ट दृष्टीकोन ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा सुधारण्याशी संबंधित आहे जेणेकरून ग्रामीण भागातील बेरोजगारीची समस्या आणि गरिबीची समस्या सोडवता येईल. आणि काही कार्यक्रम आर्थिक वाढ आणि विकासाशी संबंधित आहेत. पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा विकास हा नेहमीच विविध कार्यक्रमांच्या प्रमुख चिंतेपैकी एक राहिला आहे. त्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी, गरिबीचे निर्मूलन करून त्यांचे जीवनमान सुधारण्यासाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी अनेक ग्रामीण विकास कार्यक्रम सुरू करण्यात आले. हे कार्यक्रम ग्रामीण भागाच्या जलद विकासासाठी आवश्यक असलेल्या सामाजिक-आर्थिक पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी आणि उत्पादक रोजगार देऊन वैयक्तिक ग्रामीण लोकांचे उत्पन्न वाढवण्यासाठी तयार करण्यात आले होते. या कार्यक्रमांनी काही आर्थिक आणि सामाजिक पायाभूत सुविधा पुरवल्या, रस्ते, वीज, वाहतूक, पिण्याचे पाणी, वैद्यकीय सेवा, प्राथमिक शाळा इत्यादी सुविधा सुनिश्चित केल्या. ग्रामीण जीवनात सामाजिक-आर्थिक बदल घडवून आणण्यासाठी त्यांनी उत्प्रेरक म्हणून काम केले आहे. IADP, IAAP, DPAP, PMJY, MNREGA इत्यादी कार्यक्रम.

## ४.७ प्रश्न

1. ग्रामीण विकासाचा विभागीय दृष्टीकोन, तपशीलवार स्पष्ट करा.

2. ग्रामीण विकासाच्या सहभागात्मक दृष्टिकोनाबद्दल लिहा.

3. ग्रामीण विकासाच्या क्षेत्र विशिष्ट आणि लक्ष्य गटाच्या दृष्टिकोनातून तुम्हाला काय समजते?

4. ग्रामीण विकासाच्या सामाजिक न्यायाच्या दृष्टिकोनासह एकात्मिक ग्रामीण विकास आणि आर्थिक विकासाचे स्पष्टीकरण द्या.

## ४.८ संदर्भ


- दत्त आणि सुंदरम, "भारतीय अर्थव्यवस्था"
- देसाई वसंत, "भारतातील ग्रामीण विकास"
- सत्यसुंदरम, "ग्रामीण विकास"


❖❖❖❖

# ५

# ग्रामीण अर्थव्यवस्थेचे विविधीकरण - १

**घटक रचना :**

५.० उद्दिष्टे

५.१ प्रस्तावना

५.२ पशुधन अर्थशास्त्र

५.३ दुग्धविकास

५.४ सामाजिक वनीकरण

५.५ सारांश

५.६ प्रश्न

## ५.० उद्दिष्टे

- भारतातील पशुधन आणि दुग्धव्यवसायाचे महत्त्व जाणून घेणे.
- सामाजिक वनीकरणाविषयी जाणून घेणे.
- ग्रामीण विकासासाठी पशुधन, दुग्धव्यवसाय आणि सामाजिक वनीकरण यांचे महत्त्व जाणून घेणे.

## ५.१ प्रस्तावना

ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विविधीकरणात प्रामुख्याने पशुधन अर्थशास्त्र, दुग्धविकास, सामाजिक वनीकरणयांचा समावेश होतो. कृषी-आधारित उद्योगांच्या समस्या, निवारण उपाय, तसेच ग्रामीण विकासात खादी ग्राम उद्योगांची भूमिका, विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा अलीकडील काळातील विकास या घटकांचा प्रामुख्याने समावेश होतो.

## ५.२ पशुधन अर्थशास्त्र

ग्रामीण जीवनमानात आणिदेशांच्या अर्थव्यवस्थेच्याविकासात पशुधन महत्त्वपूर्ण भूमिका बजावते तसेच ते उत्पादक वमुल्य साखळीत काम करणाऱ्या इतरांसाठी उत्पन्न आणि रोजगाराचे माध्यमबनते आहे. गरिब महिलासाठी आणि पशुपालक गटांसाठी ते एक महत्त्वपूर्ण संपत्ती वसुरक्षेचे जाळे आहेत. ग्रामीण व शहरी कुटुंबांसाठी पोषणाचा एक

महत्त्वाचा स्रोत म्हणून पशुपालनाकडे पाहिले जाते. वाढती मानवी लोकसंख्या, उत्पन्न आणि शहरीकरणाच्या दरामुळे सामाजिक,आर्थिक आणि इतर घटकामुळे पशुपालनाचे/ पशुधनाचे महत्त्व वाढत आहे.

**५.२.१ लोकांसाठी पशुधनाचे योगदान:**

**१. पशुधन लोकांना अन्न आणि अखाद्य वस्तू पुरवतात:**

पशु मानवी वापरासाठी दूध, मांस आणि अंडी यासारखे अन्नपदार्थ पुरवतात. भारत जगातील पहिल्या क्रमांकाचा देश आहे जो दूध उत्पादनातअग्रेसर आहे . वर्ष (2017-18) मध्ये सुमारे 176.34 दशलक्ष टन दुधाचे उत्पादन झाले , 95.22 अब्ज अंडी उत्पादन झाले तर , 7.70 दशलक्ष टन मांसाचे उत्पादन अनुक्रमे झाले आहे . पशुधनाच्या उत्पादनाचे मुल्य एकूण कृषीउत्पादन आणि सबंधित क्षेत्रातून मिळणाऱ्या उत्पादन मुल्याच्या सुमारे 31.11%आहे.

**२. लोकरआणि कातडी:**

पशुपासून लोकर, केस या माध्यमातून देखील उत्पादनात योगदान देतात . लेदर हे सर्वात महत्वाचे उत्पादन आहे ज्याची निर्यात क्षमता खूप जास्त आहे. 2017-18 मध्ये भारत दरवर्षी सुमारे 41.5 दशलक्ष किलो लोकरीचे उत्पादन केले होते.

**२. वाहतुकीचे पर्यायी साधन:**

बैल हा भारतीय शेतीचा कणा आहे. भारतीय कृषी कार्यात विशेषतः ग्रामीण भागात शेतकरी अजूनही विवध कृषी कार्यांसाठी बैलांवर अवलंबून आहे. बैल इंधनाची खूप बचत करतात. घोडे, गाढवे, खेचर इत्यादी प्राण्यांचा देशाच्या विवध भागात माल वाहतूक करण्यासाठी मोठ्या प्रमाणात वापर केला जातो.

**४. शेण आणि इतर:**

प्राण्यांच्याशेणाचा वापर खत म्हणुन केला जातो. तसेच या शेणापासून बायोगॅस बनविला जातो जो ग्रामीण भागामध्ये चांगलाउर्जेचे स्त्रोत होऊ शकतो.

**५. संपत्ती:**

पशु हे शेतकाऱ्यांचे चांगले भांडवल होऊ शकते कारण आपात्कालीन परिस्थितीत गावातील सावकारांकडून कर्ज मिळवण्यासाठी प्राणी हे तारण म्हणुन ठेवता येते वप्राणांच्या तारणावर कर्जाऊ रक्कम मिळवता येते.

**६.तण नियंत्रण:**

झाडे आणि तण यांचे जैविक नियंत्रण म्हणून पशूच्याशेणखताचा व मलमुत्राचा अधिक चागला आणि सेंद्रीय पर्याय म्हणुन वापर केला जाऊ शकतो.

**७.सांस्कृतिक :**

मनुष्य हा प्राणी समाजशील आहे तो बैल, कुत्रा ,मांजर, गाई, म्हशी इ प्राणी पाळत असतो कारण त्यांना त्यातून सुरक्षितता आणि उच्च उत्पन्न मिळते. तसेच बैल पोळाला बैलाची पूजा केली जाते तर धार्मिक कार्यात गाईला अनन्या साधारण महत्व आहे.

**८.खेळ / मनोरंजन:**

ग्रामीण भागात लोक स्पर्धेसाठी आणि खेळासाठी कोंबडा, मेंढा, बैल इत्यादी प्राण्यांचा वापर करतात. तसेच सणासुदीच्या काळात कोंबड्याचीझुंज, मेंढ्यांची झुंज आणि बैलांची शर्यतव झुंज सर्रास ग्रामीण भागात पहावयास मिळते.

**९.सहचर प्राणी:**

अतिशय प्रामाणिक प्राणी म्हणुन कुत्र्याला ओळखले जाते. प्राचीन काळापासून कुत्रा हा पाणी साथीदार म्हणून पाळण्याची प्रथा आहे . तसेच मांजर हा सुधा प्राणी त्यांना आवश्यक सहवास पुरवत आहेत ज्यामुळे ग्रामीण भागातील लोकांचे जीवनमान आरामदायी जीवन होत आहे.

**५.२.२ शेतकऱ्यांच्या अर्थव्यवस्थेत पशुधनाची भूमिका:**

भारतातील शेतकरी मिश्र स्वरुपाची शेती करत आहे. म्हणजेच पीक आणि पशुधन यांचे मिश्रण राखतात. एका उद्योगाचे उत्पादन दुसऱ्या उद्योगाचे आदान बनते ज्यामुळे संसाधनाची कार्यक्षमता वाढीस लागते. खालील प्रमाणे पशुधन महत्वाची भूमिका पार पडतात .

**१) उत्पन्न:**

पशु पासून गरीब कुटुंबाना सहाय्यकउत्पन्नाचा स्त्रोतनिर्माण होतो. गरीब लोक गायी आणि म्हशी च्या दुध विक्रीतून नियिमत उत्पन्न मिळवतात . मेंढ्या आणि शेळी सारखे प्राणी आपत्कालीन पिरिस्थितीत म्हणजे लग्न, आजारी व्यक्तींवर उपचार, मुलांचे शिक्षण, घरांची दुरुस्ती इत्यादी गरजा पूर्ण करण्यासाठी उत्पन्नाचे स्रोत म्हणून काम करतात. प्राणी बँक, मालमत्ताआणि आर्थिक सुरक्षा प्रदान करतात .

**2) रोजगार:**

भारतातील लोक मोठ्या संख्येने निरक्षरआणि अकुशल असल्याने त्यांची उपजीविकाही शेतीवर अवलंबून आहेत. भारतीय शेती ही हंगामी स्वरूपाची असल्याने वर्षातील जास्तीत जास्त 180 दिवस रोजगार उपलब्ध होऊ शकतो व बाकीचे १८० दिवस पशुपालन हा जोड व्यवसायकरतात .पशुपालन हेच ग्रामीण भागात एक रोजगाराचे माध्यम बनते.

**3) अन्न पशुधन उत्पादने:**

पशुपासून दूध, मांस आणि अंडी इ उत्पादने मिळू शकतात.या उत्पादनातून मोठ्या प्रमाणात प्रथिनांचा पुरवठामनुष्यप्राणी आणि समाजातील विविध घटकांना मिळू शकतो.

**4) सामाजिक सुरक्षा:**

भारतात विवध सामाजिक व धामिक कार्यांसाठी प्राण्यांचा वापर केला जातो. घरातील समारंभासाठी गायी; सणासुदीच्या काळात बळी देण्यासाठी मेंढे, बोकड आणि कोंबडी; विविध धार्मिक कार्यक्रमांमध्ये बैल आणि गाईची पूजा केली जाते. विविध भागांमध्ये विवाहादरम्यान प्राणी भेट देणे ही एक सामान्य घटना आहे. प्राण्यांचे संगोपन हा भारतीय संस्कृतीचा एक भाग आहे

**५) वाहतुकीचे साधन :**

कमी जमीन असणारे शेतकरी नांगरणी, मळणी, शेतीची कामे व उत्पादनाची वाहतूक करण्यासाठी बैलांवर अवलंबून असतात.

**6) शेण:**

ग्रामीण भागात शेणाचा वापर अनेक कारणांसाठी केला जातो उदा इंधन ,शेणी ,खत म्हणून शेणाचा वापरतात करतात तसेच गरिबांचे सिमेंट म्हणूनसुद्धा शेणाला वापर केला जातो .

## ५.३ दुग्धविकास

दुधाचे उत्पादन करणे, त्यावर योग्य ते संस्करण करून त्याची विक्री करणे तसेच त्यापासून विविध पदार्थ बनविणे व त्यांची विक्री करणे इ. घटकांचा समावेश दुग्धव्यवसायामध्ये होतो. दुधाचे उत्पादन करणे यात दुधाळ जनावरांचे प्रजनन, खाद्य, दूध काढणे व देखभाल करणे येते. दूध व त्यापासून तयार होणारे पदार्थ आणि शहरांच्या वाढत्या दुध मागणी यामुळे एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापासून दुग्धव्यवसायाला कृषिअर्थशास्त्रामध्ये महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.

### ५.३.१ इतिहास :

आशियाच्या नैर्ऋत्य भागात ख्रि. पू. ९००० च्या सुमारास गाय माणसाळविण्यात आली आणि तेथूनच गाय, शेळी व मेंढी यांच्या दुधाचा अन्न म्हणून वापर करण्याच्या पद्धतीचा प्रसार इतर देशांत झाला असावा. इराक, पूर्व सिरिया व दक्षिण–पूर्व तुर्कस्तान ख्रि. पू. ६००० वर्षांपूर्वीच्या सुमेरियन संस्कृती वरून असे आढळते कि त्या काळात दूध विरजणे, लोणी काढणे या क्रिया सुमेरियन लोकांनी प्रथम केल्या, असे पुरावे दिसून येतात.

वैदिक शास्त्र व संस्कृत वाङ्मयातील लिखाणावरून असे दिसून येते कि ख्रि. पू. ६००० वर्षांपासून दूध व त्यापासून तयार होणाऱ्या लोणी, दही आदी पदार्थांचा वापर भारतामध्ये होत आहे,महाभारतातील, श्रीकृष्ण आणि गवळणी यांच्या अनेक कथा पारंपारिक पद्धतीने मांडल्या आहेत. या कथामधुन गाय, तिचे दूध व त्यापासून केलेले दही, लोणी हे पदार्थ भारतीय जीवनाशी निगडित असल्याचे दिसून येते.

रोमन व ग्रीक लोक दूध आणि चीज यांचा वापर अन्न म्हणून उपयोग करीत असत . तसेच हे लोक गायीपेक्षा शेळ्या व मेंढ्या यांच्या दुधाचा वापर अधिक प्रामणात आपल्या आहारात

करत असत. लोण्याचा उपयोग कातडीवरील जखमा बऱ्या करण्यासाठी व मलम म्हणून केला जाता असे.



### ५.३.२ जागतिक दुग्धव्यवसायाचा विकास :

इ. स. १८५० च्या पूर्वीच्या कालखंडात दुग्धव्यवसाय बहुतांशी कौटुंबिक पातळीवर होत असे. त्यानंतर खेडी हि दुग्धोत्पादनाची केंद्रे बनली व यातून दुग्धव्यवसायाची झपाट्याने वाढ झाली.

निकलॉस गेर्बर यांनी स्वित्झर्लंडमध्ये १८८८ च्या सुमारास व स्टीव्हेन बॅबकॉक यांनी १८९० मध्ये अमेरिकेत दुधातील वसेचे (स्निग्धांशाचे) मापन करण्याची पद्धती शोधून काढली.गुस्टाव्ह द लाव्हल यांनी १७७८ मध्ये मोठ्या प्रमाणावर दुधातील मलई,/क्रीम वेगळी काढण्याची पद्धत शोधून काढली. १८५६ मध्ये दुधाची भुकटी /पावडर तयार करण्याची पद्धत माहीत झाली. तसेच दूध टिकविण्याकरिता दुधाचे पाश्चरीकरण करण्याची पद्धत १८९५ मध्ये उदयास आली. पुढे पाश्चरीकरण केल्याशिवाय दुधाची विक्री करण्यास मनाई करणारे पहिला कायदा १९०८ मध्ये शिकागो येथे लागू करण्यात आला. शहारातील दुधाच्या वाढत्या मागणीमुळे दुधाला चांगलीकिंमतयेऊ लागली. नकळत याचा परिणाम म्हणजे शहरांना दुधाचा पुरवठा वाढला. त्याचबरोबर दूध व त्यापासून बनविलेल्या पदार्थांचा मानवी आहारात जास्त प्रमाणात समावेश होऊ लागला. या सर्व कारणांमुळे दुग्धव्यवसायामध्ये आमूलाग्र बदल घडून आला.

### ५.३.३ दुग्धोत्पादन व दुधाळ जनावरे :

गाईच्या जातीचे वर्गीकरण करणारी पहिली संघटना १८९५ मध्ये डेन्मार्कमध्ये अस्तित्वात आली. अमेरिकेमध्ये स्टँडर्ड डेअरी हर्ड इम्प्रूव्हमेंट ॲसोसिएशन ही अशीच एक नावाजलेली संघटना आहे. यातूनच पुढे स्कॉटलंडमधील आयर्शर, पूर्व स्वित्झर्लंडमधील ब्राऊन स्विस, हॉलंडमधील होल्स्टीन फ्रिजियन, इंग्लंड व इंग्लिश खाडीतील बेटांवरील जर्सी आणि गर्न्सी, डेन्मार्कमधील रेड डॅनिश या दुधाळ गाईच्या जातींची निर्मितीकरण्यात आली . आता या जातींचा प्रसार जगातील कित्येक देशांत झाला आहे. १९४० नंतर कृत्रिम वीर्यरेचनकरण्याच्या पद्धती विकसित केली त्यामुळे एकाच सिद्ध वळूचे वीर्य हजारो गायींसाठी वापरणे शक्य झाले. वीर्य साठवून ठेवण्याच्या नवीन पद्धती अस्तित्वात आली. वीर्य लांबवर वाहून नेणे शक्य झाले व प्रजननाच्या बाबतीतला सिद्ध वळूचा प्रश्न समाधानकारक रीतीने सोडविण्यात आला . अशा रीतीनेगायींच्या अभिजातीमधील दुग्धोत्पादनातच वाढ होऊन दुग्धोत्पादनाला पोषक असे बदल घडवून आणले गेले. या सुधारित जातींतील कालवडी लवकर वयात येऊन दोन ते अडीच वर्षांमध्ये वितात. तसेच वर्षामध्ये सरासरीने ९ ते १० महिने त्या दूध देतात व यामुळे दुधाच्या उत्पादनक्षमतेत कमालीची वाढली आहे.

### ५.३.४ जागतिक दुग्धशाळा :

अमेरिकेत १९६४ च्या सुमारास ११ लाख दुग्धशाळा होत्या. त्यांपैकी ६३% दुग्धशाळांमध्ये १ ते ९ गायी, २४% दुग्धशाळांत १० ते २९, ९% दुग्धशाळांमध्ये ३० ते

४९ आणि ४% दुग्धशाळांत ५० पेक्षा अधिक गायी होत्या. न्यूझीलंडमधील एका दुग्धशाळेतील गायींच्या संख्येची सरासरी 59 आहे.

अमेरिकेतील दुग्धशाळांचे अलीकडील परिवर्तन ज्याठिकाणी कमी गायी आहेत अश्यादुग्धशाळा बंद ठेवण्यात चा निर्णय घेतला आहे.

### ५.३.५ भारतातील दुग्धव्यवसाय :

भारतामध्ये प्राचीन काळापासून दुध व्यवसाय मात्र बऱ्याच प्रमाणात विस्कळित व कौटुंबिक पातळीवरच चालतआला आहे, त्याला व्यवसायाचे फारसे स्वरूप नव्हते . बहुसंख्य लोक मुख्यत्वे शेतीकामासाठी लागणाऱ्या बैलांच्या उपयोगासाठी गायी पाळत असत तसेच स्वतःची दुधाची गरज भागविण्यासाठी एकदोन म्हशी पाळत असत. दुग्धोत्पादन व दुग्धव्यवसाय हा त्यांचा दुय्यम हेतू आहे. अपुरा चारा व अपुरा खुराक यांमुळे दूध देणारी जनावरे निकृष्ट प्रतीची राहिली. अलीकडील काळात गीर, शाहिवाल, सिंधी, थरपारकर, हरियाणा, ओंगोल, कांक्रेज या गायींच्या आणि निलीराबी, मुरा, म्हैसाणा, जाफराबादी या म्हशींच्या जाती दुग्धोत्पादनासाठी प्रसिद्ध आहेत. गायी व म्हशींच्या एकूण संख्येपैकी म्हशींची संख्या अवघी ३०% आहे. तथापि एकूण दुग्धोत्पादनापैकी ५३% दूध म्हशींचे आहे. १९७० मध्ये भारतातील दुग्धोत्पादन २ कोटी १३ लाख टन इतके होते . यातील ९५ लाख टन गायींचे, १ कोटी १२ लाख टन म्हशींचे व ५ लाख टन शेळ्यांचे होते. १९७३–७४ मध्ये दुग्धोत्पादन २ कोटी ३० लाख टन झाले. सरासरीने एका म्हशीपासून एका दुग्धकालात ५४० लि., तर गायीपासून १७० लि. दूध मिळते. पंजाब, गुजरात, उ. प्रदेश व बिहार ही राज्ये दुग्धोत्पादनात आघाडीवर आहेत.

भारतात दळणवळणाची साधने उपलब्ध झाली आणि खेड्यातून होणारा दुग्धपुरवठा शहरापर्यंत पोचला.

### ५.३.६ भारतातील दुग्धव्यवसायातील परिवर्तन :

गुजरातमध्ये व्यापारी तत्त्वावर दूध गोळा करण्याचे प्रयत्न १९०६ च्या सुमारास पोलसन कंपनीने केलेले दिसून येतात. या संघाचे मुख्य कार्यालय आणंद येथे आहे. संघाचे कामकाज आदर्श समजले जाते व त्यामुळेच ‘आणंद पॅटर्न’ हे नाव प्रसिद्ध झाले.

भारतात सहकारी तत्त्वावर दुग्धोत्पादन पुरवठा करणारी पहिली सहकारी संस्था, खेडा जिल्हातील दुग्धोत्पादक संघ१९४७ मध्ये स्थापना झाली. बृहन्मुंबई दुग्ध योजना ही या प्रकारची भारतातील पहिली योजना मुंबईच्या दुग्धपुरवठ्याचा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्य शासनाने दुग्धविकास खात्यामार्फत कार्यान्वित केली. मुंबईजवळ आरे येथे अद्ययावत यंत्रसामग्री बसविलेले दुग्धप्रक्रियालय स्थापन करण्यात आले. या प्रक्रियालयाच्या शेजारी २०,००० दूध देणारी जनावरे (गायी व म्हशी) ठेवण्यासाठी अद्ययावत पद्धतीचे गोठे बांधण्यात आले व म्हशींच्या परवानेधारक मालकांना कमी भाड्यामध्ये गोठे, ठराविक दराने चारा व खुराक मिळण्याची सोय, पशुवैद्यकीय मदत इ. सोयी उपलब्ध करून देऊनत्यांना मदत केली मात्र यासाठी परवानेधारकांनी आपले सर्व उत्पादित दूध योजनेला विकले पाहिजे, असे बंधन करण्यात आले.

केंद्र शासनाने १९६५ मध्ये राष्ट्रीय दुग्धविकास मंडळ स्थापन केले. या मंडळाचा मुख्य उद्देश राज्य शासनांना आणंद पॅटर्नच्या धर्तीवर दुग्ध त्पादकांचे सहकारी संघ स्थापन करण्यास मदत करणे हा होता . या मंडळाने ‘ऑपरेशन फ्लड’ नावाची योजना १९६८–६९ मध्ये आखणी करून त्याची दुग्धव्यवसाय महामंडळामार्फत कार्यवाही पण सुरू केली आहे.

‘ऑपरेशन फ्लड’ या योजनेचासुरवातीच्या टप्प्याचे उद्दिष्ट मुंबई, दिल्ली, मद्रास आणि कलकत्ता या चार शहरांचा रोजचा दुग्धपुरवठा जास्तीत जास्त प्रमाणात राज्य शासनांच्या दुग्धविकास खात्यांमार्फत ग्रामीण भागातून गोळा करणे आणि त्याचा पुरवठा या शहरांना करणे यासाठी शहरांशी संलग्न अशी १८ केंद्रे निवडून त्याभागात विशेषत्वाने दुग्धोत्पादन वाढविण्याचे प्रयत्न करणे हे आहे.

### ५.३.७ दुग्धप्रक्रिया व वितरण :

दूध काढणे, त्यातील गाळ काढणे, पाश्चरीकरण, एकजिनसीकरण या प्रक्रिया तसेच बोट्ल भरणे, बुचे लावणे इ. अनेक गोष्टी स्वयंचलित यंत्राने करणे. अलीकडे ही यंत्रेही दूरनियंत्रण पद्धतीने चालविली जातात. त्यामुळे नियंत्रक फलक पाहून त्याच्या आधारावर खोलीत बसून दुग्धप्रक्रियालयातील बऱ्याच प्रक्रिया एकच माणूस करू शकतो.यंत्राने दूध स्वच्छ करणे त्याचे पाश्चरीकरण करने. पाश्चरीकरण झालेले दुध पुढे एकजिनसीकरण करण्यासाठी पुढे पाठवणे. पाश्चरीकरणानंतर थंड दूध बॉटलमध्ये वा कार्डबोर्डाच्या खोक्यांमध्ये स्वयंचलित यंत्राच्या साहाय्याने भरले जाऊन लगेच बुचे लावण्याचे किंवा खोकी बंद करण्याचे कामही यंत्राच्या साहाय्यानेच होते. बॉटल अगर खोकी नंतर शीतकोठीमध्ये साठविणे . तेथून त्या गिऱ्हाइकाला घरपोच पाठविणे किंवा विभागीय वस्तुभांडारामध्ये पाठवितात. १९६४ पासून बॉटल ऐवजी प्लॅस्टिकच्या पिशव्यांचा वापर मोठ्या प्रमाणावर होऊ लागला आहे

काही दुग्धशाळांमध्ये दुधातील मलई वेगळी करण्याची, आईसक्रीम, चीज, मलईयुक्त दूध आणि इतर दुग्धजन्य पदार्थ बनविणाऱ्या तसेच गरजेप्रमाणे मलईचे प्रमाण राखून काही प्रमाणित पूर्ण क्रीम असलेले दुध विक्री करतात. उत्पादित दूध गोळा करणे, त्यावरील प्रक्रिया व वितरण यांची व्यवस्थापन पद्धती बहुतेक विकसित देशांमध्ये वरीलवर्णनाप्रमाणे थोडीफार साचेबंद आहे.

### ५.३.८ दूध आणि दुग्धजन्य पदार्थ :

दुधाचे आटीव दूध, संघनित गोड दूध व दुधाची भुकटी असे प्रकार उपयोगात आहेत याशिवाय लोणी, तूप, ताक, दही, आईसक्रीम, चीज, योगर्ट, केफिर, क्युमिस, बालकांसाठी खास दुग्धान्न, मिठाई.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात प्रशीतन तंत्राच्या प्रगतीमुळे दूध आणि दुग्धजन्य पदार्थ गोठविण्यात येऊ लागले. याचा मुख्य उद्देश दुधाच्या हंगामाच्या वेळी दूध, संघनित दूध, संघनित मलईरहित दूध इ. गोठवून साठविता येतात. दुग्धोत्पादनात घट झाली तर या पदार्थांचा उपयोग करून दुग्धव्यवसाय स्थिर ठेवण्यास यामुळे मदत होते.

### ५.३.९ दुधाची किंमत ठरविण्याची पद्धत :

भारतामध्ये राज्याराज्यांतील दुधाच्या विक्रीच्या किंमती वेगवेगळ्या आहेत पण वितरणासाठी राज्य शासन खरेदी करून नंतर त्या दुधाची किंमत ठरविण्यासाठी राज्यांची दुग्धमंडळे अस्तित्वात आहेत. केंद्र शासनाचे कृषिमंत्रालय, भारतीय दुग्धव्यवसाय महामंडळ, राष्ट्रीय दुग्धविकास मंडळ, राज्य सरकारांची दुग्धविकास खाती व महामंडळे आणि दुग्धोत्पादकांचे सहकारी संघ इ. संस्था दुग्धव्यवसायाचे धोरण, दुग्धोत्पादन, वितरण, संशोधन, तंत्रज्ञान इ. दुगधव्यवसायाशी संबंधित विषयांमध्ये कार्य करीत आहेत.

### ५.३.१० यंत्रसामग्री :

बहुतांशी यंत्रसामग्री जंतुनाशकद्रव्ये वापरून जागेवरच स्वच्छ करण्यात येते. निर्जंतुक करण्यासाठी विशिष्ट दाब असलेल्या वाफेचा उपयोग मोठ्या प्रमाणावर करतात. द्रव पदार्थांचे वहन, हवेच्या दाबाने केले जाते. द्रव पदार्थांच्या गुणधर्मांचा विचार करून ही यंत्रसामग्री बनविण्यात येते. दुधाशी स्पर्शित होणारे भाग अलीकडे अग पोलादाचे बनविलेले असतात. यंत्रसामग्रीला चलशक्ती आणि उष्णता विद्युत् शक्ती पुरविण्यात येते. दुग्धव्यवसायामध्ये प्रामुख्याने खालील यंत्रसामुग्री वापरली जाते.

**1) एकजिनसीकरण करण्याचे यंत्र :**

एकजिनसीकरणामध्ये पंपाच्या साहाय्याने दूध जास्त दाबाने बारीक छिद्रे असलेल्या तबकडीतून जोराने बाहेर काढले जाते. यामुळे दुधातील क्रीम च्या गोलिकांची मोडतोड होऊन त्यांचे आकारमान लहान होते.

**2) पाश्चरीकरणाची यंत्रसामग्री :**

दूध विशिष्ट तापमानापर्यंत तापवून त्या तापमनातच विशिष्ट काळ ठेवून नंतर त्वरित थंड केले जाते.

**3) निर्जलीकरण व भुकटी करण्याची यंत्रसामग्री :**

निर्जलीकरण म्हणजे दूध आटविणे. दूध ज्या भांड्यात तापत असते त्या बंद भांडे हवा विरहितकेले जातेत्यामुळे कमी तापमानात दुधातील पाण्याची वाफ केली जाऊन दूध आटविण्याची क्रिया पार पडते. या भांड्यातील दुधाचे तापमन ५४·८° ते ६०° से. इतके ठेवतात.

**4) शिक्षण व संशोधन :**

भारतामध्ये कर्णाल (हरियाणा) येथील नॅशनल डेअरी रिसर्च व बंगलोर, मुंबई येथील शाखांत तसेच आणंद येथील डेअरी टेक्नॉलॉजी इन्स्टिट्यूटमध्ये पदवी व पदव्युत्तर शिक्षणाची आणि अलाहाबाद, हरिंघाटा (कलकत्ता) व मुंबई येथे पदविका शिक्षणाची सोय आहे. यांशिवाय सर्व राज्यांतील कृषी विद्यापीठांशी संलग्न असलेल्या पशुवैद्यकीय महाविद्यालयांतून तसेचउत्तर प्रदेश येथील इंडियन व्हेटनरी रिसर्च इन्स्टिट्यूट या संस्थेमध्येही या शिक्षणची व्यवस्था आहे. नॅशनल डेअरी सायन्स ॲसोसिएशन या संस्थेमार्फतइंडियन डेअरीमॅन (मासिक) व इंडियन जर्नल ऑफ डेअरी सायन्स (त्रैमासिक) ही नियतकालिके तसेच नॅशनल डेअरी रिसर्च इन्स्टिट्यूटतर्फे डेअरी इक्स्टेन्शन्स (मासिक) व वार्षिक अहवाल प्रसिद्ध करण्यात येतात.

आंतरराष्ट्रीय स्तरावर कॉमनवेल्थ ब्यूरो ऑफ डेअरी सायन्स अँड टेक्नॉलॉजी ही ब्रिटनमधील संस्था, डेअरी सोसायटी इंटरनॅशनल ही अमेरिकेतील संस्था आणि इंटरनॅशनल डेअरी फेडरेशन ही आंतरराष्ट्रीय संस्था दूध व दुग्धव्यवसायाशी संबंधित विषयावरील संशोधन व तंत्रविद्या यांची माहिती गोळा करतात आणि ती जगातील संशोधक व शैक्षणिक संस्थाच्या नियतकालिकांद्वारे उपलब्ध करून देतात. इंटरनॅशनल डेअरी फेडरेशन ही संस्था दुग्धव्यवसायाशी संबंधित विषयांवरील संशोधानाद्वारे उपलब्ध होणाऱ्या माहितीची देवाणघेवाण होण्यासाठी व दुग्धव्यवसायाच्या प्रगतीसाठी दर चार वर्षांनी जागतिक परिषद भरविते.

## ५.४ सामाजिक वनीकरण

### ५.४.१ प्रस्तावना:

सामाजिक वनीकरण म्हणजे पर्यावरणीय, सामाजिक आणि ग्रामीण विकासाला मदत करण्याच्या उद्देशाने जंगलांचे व्यवस्थापन करणे, देखभाल करणे, तसेच जंगलतोड आणि नापीक प्रदेशांचे पुनर्वसन करणे होय. "सामाजिक वनीकरण" हा वाक्यांश 1976 मध्ये द नॅशनल कमिशन ऑन ऍग्रीकल्चरने तयार केला होता . हा शब्द राष्ट्रीय वन आयोगाने 1976 मध्ये सामाजिक वनीकरण यासाठी वापरला होता . मानवी जंगलतोड असलेला भाग किंवा नागरी वसाहतींच्या आसपासच्या जमिनीचा वापर झाडे लावणे यासाठी करणे हे आयोगाचे मुख्य उद्दिष्ट आहे.पर्यावरणीय फायद्यासाठी आणि ग्रामीण विकासासाठी ओसाड भागात वनीकरण करणे , वनांचे व्यवस्थापन करणे आणि वनांचा विकास करणे याला सामाजिक वनीकरण म्हणतात.

मानवी वस्त्यांजवळील सरकारी वनजमिनी ,महामार्ग, रस्त्याच्या कडेला असलेला जमिनीचा भाग, नदी व कालव्याच्या काठावर असलेला जमिनीचा भाग, सामाईक जमीन, सरकारी कचरा मैदान इ ठिकाणी वृक्षारोपण आणि त्यांची लागवड करणे या धोरणात अपेक्षित आहे.

### ५.४.२ सामाजिक वनीकरणाची उद्दिष्टे:

१) प्रतिकूल हवामान घटकांपासून शेतीचे संरक्षण करण्यासाठी पर्यावरण सुधारणे.

२) घरगुती इंधन, ग्रामीण घरांसाठी , पशुधनासाठी चारा यांचा पुरवठा वाढवणे.

३) ग्रामीण आणि शहरी लोकसंख्येच्या फायद्यासाठी मनोरंजक जंगले तयार करणे.

४) अकुशल कामगारांनासामाजिक वनीकरणाच्या माध्यमातून नोकरीच्या संधी उपलब्ध करणे.

५) प्रभावी जमीन पुनर्वसन करणे.

६) ग्रामीण आणि शहरी लोकांचे राहणीमान आणि जीवनमान उंचावणे.

### ५.४.३ सामाजिक वनीकरणाचे फायदे:

**१) ग्लोबल वॉर्मिंगविरुद्ध लढा:**

झाडे वातावरणातील कार्बन डाय ऑक्साईड शोषून घेण्याचीमहत्वाची भूमिका बजावत आहेत. झाडे कार्बन डायऑक्साइड कमी करतात त्यामुळे वातावरणात थंडावा राहतो आणि त्यामुळे ऊर्जेचा वापर कमी होण्यास मदत होईल.

**२) माती संवर्धन:**

झाडाची मुळे माती धरून जमिनीची होणारी धूप रोखण्यास मदत करतात. नापीक पृष्ठभागावर सामाजिकवनीकरणामुळे मोठ्या प्रमाणात झाडांचीलागवड केली तर मातीची धूप कमी होण्यास मदत होईल. जामिनावरील झाडाच्या पानाचा वरच्या बाजूला सेंद्रिय थर तयार करून आणि मातीची धूप कमी करून माती समृद्ध होईलव पाणी साठविण्याची मातीची क्षमता वाढते.

**३) जैवविविधता वाढेल:**

घनदाट जगलामुळे विविध प्रकारची जैवविविधता वाढीस लागते उदा चांगली वाढलेली झाडे विविध प्राणी, झाडे, झुडपे, पक्षी, कीटक इत्यादींसाठी निवासस्थान देतात तसेच अन्न आणि निवारा निर्माण करतात.

**४) हवेची गुणवत्ता सुधारण्यास मदत:**

झाडे हवेतील कार्बन डाय ऑक्साईड शोषून घेतात आणि ऑक्सिजन हवेत सोडतात त्यामुळे हवेमध्ये ऑक्सिजन चे प्रमाण वाढवण्यास झाडे मदत करता तसेच अनेक प्रकारच्या झाडांमध्ये औषधी गुणधर्म असतात ज्याचा उपयोग रोगावरऔषध म्हणुन वापरता येते.

**५) ऊर्जेचे संवर्धन:**

वन सवर्धन मुळे हवेत गारवा निर्माण होतो त्यामुळे वनक्षेत्रातहवेत थंडावा निर्माण होतो व त्यामुळे एअर कंडिशनर वर होणारा खर्चामध्ये बचत होईल.म्हणजे विजेची मागणी कमी होईल व उर्जेचे संवर्धन होईल.

**६) सामाजिक लाभ:**

सामाजिक वनीकरण हे उद्यानांच्या माध्यामतून लोकांच्या करमणुकीचे साधन बनतेय आणि त्यातून लोकांचे सामाजिक जीवनमान उंचवण्यास मदत होते,ज्याचासमाजाला फायदा होतो.

**५.४.४ सामाजिक वनीकरनाचे प्रकार:**

सामाजिक वनीकरणाचे विविध प्रकार आहेत, जे खाली सूचीबद्ध आहेत.

१) वैज्ञानिक वनीकरण

२) शेती वनीकरण

३)सामुदायिक वनीकरण

४) कृषी-वनीकरण

५) विस्तार वनीकरण

**१) वैज्ञानिक वनीकरण :**

नवीन पिके आणि झाडे लवणे यावर लक्ष केंद्रित करणे याचा समावेश वैज्ञानिक वनीकरणातहोतो. वैज्ञानिक वनीकरणाची विविध उद्दिष्टे म्हणजे रिकाम्या भागात झाडेलावणे, जंगलावर आधारित उद्योगांसाठी कच्चा माल मिळवणे, रोजगाराच्या संधी वाढवणे, उच्च-गुणवत्तेच्या प्रजातींचे लाकडाचे उत्पादन आणि मातीचे संवर्धन व सुनिश्चित करणे यांचा समावेश होतो.

**२) शेती वनीकरण:**

शेतीच्या संदर्भातील विशिष्ट हेतूसाठी झाडांचे व्यवस्थापन करणे यामुळेपर्यावरण सुधारणे, माती, पाण्याची देखभाल होते, अतिरिक्त कमाई, जनावरांसाठी निवारा आणि कुरण प्रदान करणे शक्य होते.

**३) सामुदायिक वनीकरण:**

स्थानिक लोकांच्या मदतीने वन पिकांचे नियोजन, व्यवस्थापन आणि कापणी करणे. गावपातळीवरील वनीकरणाचा उपक्रम आयोजित करणे.

**४) कृषी वनीकरण:**

कृषी उत्पादने आणि कृषी उत्पादन आधारावर उत्पादन करण्याच्या उद्देशाने शेती आणि वृक्ष वाढवण्याच्या क्रियांचे आयोजन करणे. वनीकरणाची ही पद्धत उत्पादकता, आर्थिक फायदे, सामाजिक परिणाम ,पर्यावरणीय वस्तू आणि सेवा वाढविण्यात मदत करते.

**५) विस्तार वनीकरण:**

या प्रकारत जंगलांच्या सीमा वाढण्यास प्रयत्न केले जातात म्हणजे पडीक जमीन नापीक जमीन शासकीय पडीक जमिनी, पंचायतींच्या जमिनी, गावातील सामाईक गावरान जमिनीवर झाडे लावणे यासारखे उपक्रम केलेजातता.

**५.४.५ सामाजिक वनीकरण – कमतरता:**

अन्न सुरक्षा आणि शेती धोक्यात आणणाऱ्या प्रोत्साहनांच्या ऐवजी शेतजमीन वनीकरणाकडे वळवण्यात आली आहे. अपुरीमाहिती आणि अज्ञान ह्यामुळे, सामाजिक वनीकरणासाठी वृक्षारोपणांनी अशा प्रजातीची लागवड केली जी पर्यावरणासाठी अयोग्य होत्या.

छोट्या जमिनीच्या आकारामुळे, भारतीय शेतकरी वारंवार सामाजिक वनीकरणाला विरोध करतात.

सामाजिक वनीकरण होणारे उत्पादन हे कोणत्याही कृषी विमा योजनेत समाविष्ट नाही आणि त्यांना विपणन सहाय्य मिळत नाही. सरकार सामाजिक वनीकरणाला प्रोत्साहन देते पण खाजगी क्षेत्र यासाठी मर्यादित मदत करते. सामाजिक वनीकरणाकडे शेतकऱ्यांनी रोख

उत्पन्न देणारा व्यवसाय  म्हणून पाहिले पाहिजे. कृषी वनीकरणामुळे रोजगार कमी झाला आणि अनुपस्थित जमीनदारी वाढली.

### ५.४.६ सामाजिक वनीकरण - भारतात

1980 च्या दशकाच्या मध्यात जागतिक बँक आणि युरोपियन युनियनयांच्या आर्थिक पाठिंब्याने भारतात सामाजिक वनीकरणाला सुरुवात झाली.  वन संरक्षण आणि वनसंवर्धन करणे यासाठी मदत झाली.1988 च्या वन धोरण कायद्याने सामाजिक वनीकरणाला मदत केली आणि ती एक लोक चळवळ बनली.

सामाजिक वनीकरणाला प्रोत्साहन देणाऱ्या सरकारी कार्यक्रमांमध्ये मनरेगा,  फॉरेस्ट्री रिसर्च, नैसर्गिक राखीव जंगले, वनमहोत्सव तसेच पर्यावरण दिन आणि वन्यजीव सप्ताह यांसारख्या जागरूकता मोहिमा यांचा समावेश होतो.

### ५.४.७ निष्कर्ष:

सामाजिक वनीकरणामध्ये कृषी वाढ आणि विकासासाठी अनेक साधने प्रदान करते. सरकारी क्षेत्र, खाजगी क्षेत्र व इतर सर्व नागरिकांनीकिंवा सर्व भागधारकांनी विविध आव्हानांना तोंड देण्यासाठी सामाजिक वनीकरणाचे उपक्रम राबवण्यासाठी किंवापुढाकार घेण्यासाठी एकत्र काम केले पाहिजे.

## ५.५ सारांश

पशुधन मानवी जीवनात खूप महत्त्वाची भूमिका बजावते मग ते त्यांच्या शेतीसारख्या आर्थिक क्रियाकलापांशी संबंधित असो किंवा त्यांना सोबती प्रदान करण्याशी संबंधित असो. दुग्धव्यवसायातही पशुधन महत्त्वाची भूमिका बजावते, दुग्धव्यवसायामुळे अमूल सारख्या युनिटची स्थापना करून लाखो लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. सामाजिक वनीकरण म्हणजे स्थानिक लोकांच्या गरजांसाठी वन वस्तूंचे उत्पादन. सामाजिक वनीकरणाची मुख्य कल्पना म्हणजे वनक्षेत्रात राहणाऱ्या लोकांना जंगलाचा वापर करून रोजगार उपलब्ध करून देणे आणि त्याच बरोबर वनीकरणाच्या प्रक्रियेतून जंगलाचे आच्छादनही वाढते.

## ५.६ प्रश्न

**टिपा लिहा**

1) पशुधन अर्थशास्त्र

2) दुग्धविकास

3) सामाजिक वनीकरण

❖❖❖❖

# ६

# ग्रामीण अर्थव्यवस्थेचे विविधीकरण – २

**घटक रचना:**

६.० उद्दिष्टे

६.१ प्रस्तावना

६.२ कृषी-आधारित उद्योग

६.३ खादी व ग्रामोद्योग आयोग

६.४ ग्रामीण अर्थव्यवस्थेतील विज्ञान आणि तंत्रज्ञानाची सध्यस्थिती

६.५ सारांश

६.६ प्रश्न

६.७ संदर्भ

## ६.० उद्दिष्टे

- कृषी आधारित उद्योगांच्या समस्या आणि उपाय जाणून घेणे.
- ग्रामीण विकासातील खादी व ग्रामोद्योग आयोगची संकल्पना जाणून घेणे.
- ग्रामीण विकासातील विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या अलीकडील विकासाची माहिती घेणे.

## ६.१ प्रस्तावना

या प्रकरणामध्ये आपल्या देशातील कृषी-आधारित उद्योगांना भेडसावणाऱ्या समस्यांचा अभ्यास केला आहे आणि त्याच वेळी आपण अशा समस्यांचे निराकरण किंवा उपाय पाहिले आहेत. त्याचबरोबर खादी आणि ग्रामोद्योग आयोगाने (KVIC) ग्रामीण विकासात कोणती भूमिका बजावली आहे हे देखील आम्हाला समजले. तसेच आम्ही विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या नवीनतम विकासावर आणि आपल्या देशाच्या ग्रामीण विकासामध्ये त्याची भूमिका यावर लक्ष केंद्रित केले आहे.

## ६.२ कृषी आधारित उद्योग

### ६.२.१ प्रस्तावना:

भारतासारख्या कृषी प्रधान देशात कृषी आधारित उद्योगांना अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. तसेच शेतीवर अवलंबून राहणाऱ्या लोकांच्या संखेत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे .ग्रामीण भागात शेतीवर आधारित उद्योग निर्माण झाले तर ग्रामीण भागातील लोकांना उपजीविकेसाठी रोजगाराचे साधन उपलब्ध होईल आणि रोजगारासाठी शहराकडे जाणाऱ्या लोकांचे प्रमाण कमी होईल.कृषी आधारित उद्योगामुळे स्थलांतराला आळाबसेल व प्रादेशिक विषमता कमी होईल. सामाजिक आर्थिक, सांस्कृतिक, परिवर्तनाची प्रक्रिया हि फक्त कृषी आधारित उद्योगामुळे शक्य आहे म्हणून राज्यातील शेती आधारित उद्योग विकासावर भर देणे महत्वाचे आहे. कृषी उद्योगामुळे रोजगार वाढवून लोकांच्या उत्पन्नात वाढ होते व उपभोग वाढवून राहणीमान सुधारते आणि ग्रामीण भागाचा कायापालटहोण्यास मदत होते. कृषी आधारीत उद्योग म्हणजे शेतीच्या उत्पादनावर प्रक्रिया करून विविध प्रकारचे उत्पादन करणाऱ्या उद्योगांना कृषी आधारित उद्योग म्हटले जाते.

### ६.२.२ कृषी आधारित उद्योगांच्या समस्या:

**१) कच्च्या मालाचा प्रश्न:**

कृषी आधारित उद्योगांनागुणवत्तादार कच्च्या माल पुरेशा प्रमाणात ,योग्य वेळी, योग्य ठिकाणीआणि योग्य किमतीलापुरवठा होणे गरजेचे आहे .पण या उद्योगांनायोग्य प्रकारचा कच्च्या मालाचा पुरेसा प्रमाणात, योग्य वेळी ,योग्य किमतीला, पुरवठा होऊ शकत नाही.अखंडित पुरवठ्यामुळे बरेच उद्योग बंद पडतात.

**२) भांडवलाची कमतरता:**

कृषी आधारित उद्योगांना सहकारी बँका, राष्ट्रीय बँका, व्यापारी बँका,व वित्तीय संस्था यांच्याकडून दीर्घ कालीन वित्तीय पुरवठा कमी प्रमाणात उपलब्धहोतो. तसेच या उद्योगांना बाजारामध्ये पत कमी आहे त्यामुळे बँकांकडून कर्जे मिळविण्यात अनेक अडचणींना सामोरे जावे लागते त्यामुळे अपुरा भांडवलाचा पुरवठ्यामुळे हे उद्योग बंद पडतात .

**३) उत्पादनाची जुनीतंत्रे :**

कृषी उद्योगांमध्ये कालबाह्य तंत्राचा वापर केला जात आहे त्यामुळे उत्पादन खर्च जास्त होतोआणिव त्या उत्पादनाचा दर्जाचेखालावलेला असतो त्यामुळे हे उद्योग मोठ्या उद्योगांच्या स्पर्धेत टिकू शकत नाहीत कारण मोठ्या उद्योगांमध्ये कमी खर्चात दर्जेदार उत्पादन केले जाते.

**४) मालाच्या विक्रीची समस्या:**

कृषी उद्योगामध्ये जुना तंत्रांच्या वापरामुळे उत्पादनाचा दर्जा कमी आणि वस्तुंच्या किमती जास्त असतात त्यामुळे या वस्तु बाजारपेठेत अधिक किमतीला विक्रीची करतात

त्यामुळेविक्रीची समस्याहोण्याची शक्यता असते. तसेच जाहिराती, विक्री संघटन, विक्री इ.च्या अभावामुळे विक्रीची समस्या निर्माण होते.

**५) मोठ्या उद्योगांची स्पर्धा:**

मोठ्या उद्योगात तयार होणाऱ्या वस्तुंच्या किमती आणि दर्जा कृषी उद्योगांच्या तुलनेने कमी आणि योग्य असतात त्यामुळे कृषी उधोगातील वस्तूंना मागणी कमी आहे त्यामुळे हे उद्योग दुर्दैवाने स्पर्धेत टिकू शकत नाहीत.

**६) मोठ्या उद्योगांची स्पर्धा:**

कृषी उद्योगातून तयार होणाऱ्या वस्तूचा दर्जा, गुणवत्ता आणि किंमत हि मोठ्या उद्योगाच्या तुलनेत हलका, कमी आणि जास्त अनुक्रम असतो त्यामुळे कृषी उद्योग मोठ्या उद्योगच्या स्पर्धा मध्येटिकू शकत नाहीत.

**7) कराचा बोजा:**

कृषी आधारित उद्योगाच्या उत्पादनावर केंद्र व राज्य सरकार विविध प्रकारचे कर आकारत असतात त्यामुळे वस्तूच्या किमती आणखी वाढतात व वस्तूची मागणी कमी होऊन विक्री घट होते व नफा कमी होतो.

**8) ग्राहकांची मनोवृत्ती:**

मोठ्या उद्योगांमध्ये तयार होणाऱ्या वस्तू या आकर्षक असतात त्यामुळे या वस्तूकडे ग्राहकवर्ग मोठ्या प्रमाणात आकर्षित होतात तसेच मोठे उद्योग जाहिरातीवर मोठ्या प्रमाणात खर्च करून ग्राहकांना प्रभावित करतात पण लघुउद्योगांना हा खर्च शक्यनसते त्यामुळे ग्राहक वर्ग मोठ्या उद्योगांच्या उत्पादनाकडे आकर्षित होऊन कृषी आधारित उद्योगाच्या उत्पादनावर दुर्लक्ष्य करतो.

**9 ) अकार्यक्षम व्यवस्थापन:**

कोणत्याही व्यवसायामध्ये व्यवस्थापक हा अनुभवी कुशल,प्रशिक्षित आणि अनुभवी असेल तर व्यवसायाचे व्यवस्थापन कार्य उत्तम, प्रभावी आणि परिणामकारक होते तसेच उत्पादन खर्च कमी होतो वस्तूचा दर्जा सुधारतो. परंतु कृषी व्यवसायामध्ये कुशल, अनुभवी व्यवस्थापक व्यक्तीचाअभाव आहे, त्याचा उद्योगांच्या विकासावर परिणाम प्रतिकूल परिणाम होत आहे .

**६.२.३ कृषी आधारित उद्योगांच्या समस्यावर उपायोजना:**

**अ) वित्तपुरवठ्याच्या सोयी:**

कोणत्याही उद्योगासाठी भांडवलाची आवश्यकता असतेकारण भांडवल हे उद्योगाची संजीवनीचे कार्य करत असते. राज्यातील उद्योगांचा जलद गतीने विकास होण्यासाठी राज्य शासनाने वेळेवर आणि पुरेशा प्रमाणात वित्तपुरवठा करणाऱ्या संस्थांची स्थापना केली पाहिजे अशा संस्था पुढीलप्रमाणे आहेत.

**1) महाराष्ट्रा राज्य वित्त महामंडळ :**

राज्यातील लघु व मध्यम उद्योगांना वित्तपुरवठा करणे, त्यांना प्रोत्साहन देणे, राज्यातील औद्योगिक मागासलेपणा व प्रादेशिक विषमता कमी करणे या उद्देशासाठी महाराष्ट्र शासनाने 1 एप्रिल 1962 रोजी 'महाराष्ट्र राज्य 'वित्त महामंडळाची स्थापना केली. हे महामंडळ लघु व मध्यम उद्योगांना जमीन, इमारती, यंत्रसामग्री, उपकरणे यासारखी स्थावर मालमत्ता खरेदी करण्यासाठी दीर्घकालीन वित्तपुरवठा करतअसते. वैयक्तिक मालकीच्या उद्योगांना 30 लाख रुपयेपर्यंत व मर्यादित कंपन्यांना 60 लाख रुपयांपर्यंत जास्तीत जास्त 10 वर्षे मुदतीची कर्जे दिली जातात. या महामंडळाने 1962 ते 1990 पर्यंत 34,091 उद्योग घटकांना 918 कोटी रुपयाची कर्जे मंजूर केली व त्यापैकी 617 कोटी रुपये कर्ज वाटप केले. 2000-01 मध्ये या महामंडळाकडून 68.63 कोटी रुपयाची कर्जे मंजूर करण्यात आली व त्यापैकी प्रत्यक्ष वाटप 47.12 कोटी रुपये इतके झाले. या महामंडळाच्या कार्यामुळे लघुउद्योगाच्या विकासाला चालना मिळाली व रोजगारनिर्मितीत वाढ झाली आहे

**२) महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ:**

सन 1962 मध्ये महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळची स्थापना करण्यात आली. या महामंडळाचे मुख्य उद्धेश पुढील प्रमाणेआहेत:

1) लघुउद्योगांना लागणारा कच्चा माल पुरवठा करणे

2) लघुउद्योगांतील उत्पादित मालाला योग्य बाजारपेठ मिळवून देणे

3) लघुउद्योगांतील माल साठवणूक आणि हाताळणीसाठी योग्य सोयी उपलब्ध करून देणे,

4) लघुउद्योगांतील माल आयात-निर्यातीकरिता साहाय्य करणे.

5) हस्तउद्योगांतील कारागिरांना मदत करणे.

6) लघुउद्योगांतील मालाचीविक्रीसाठी प्रदर्शन आयोजित करणे.

**ब) औद्योगिक वसाहतीची स्थापना:**

पायाभूत सुविधांच्या अभावामुळे कृषी उद्योग विकासात अडथळे निर्माण होतात. मोठ्या शहराबरोबरच लहान शहरामध्ये अथवा गावपातळीवर औद्योगिक वसाहती स्थापन करणे त्यामुळे उद्योगाच्या विकासासाठी पायाभूत सोयी-सुविधा उपलब्ध होतील या उद्धेशाने राज्यात औद्योगिक वसाहती स्थापन करण्याचे धोरण स्वीकारले आहे. त्या औद्योगिक वसाहतीपुढील प्रमाणे आहेत.

**1) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ:**

राज्यभरात औद्योगिक वाढ साध्य करण्यासाठी ,लघु औद्योगिक वसाहती स्थापन करणे, विकास केंद्राची स्थापना करणे आणि पंचतारांकित औद्योगिक वसाहतीची स्थापना करण्यासाठी 1 ऑगस्ट 1962 रोजी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना

करण्यात आली. या महामंडळामार्फत अंतर्गत रस्ते, पाणी, वीजपुरवठा व उद्योजकासाठी अंतर्गत सेवा , पायाभूत सोयीनीयुक्त अशा औद्योगिक वसाहती विकसित केलेआहेत. मार्च 2010 मध्ये औद्योगिक घटकांची संख्या 33,355 इतकी होती त्यांची एकत्रित गुंतवणूक 53,792 कोटी रुपये होती व या क्षेत्रात 8.80 लाख रोजगार निर्माण झालेहोते.

**2) सहकारी औद्योगिक वसाहती:**

राज्य शासन सहकारी औद्योगिक वसाहतीमध्ये लघु व कुषी आधारित उद्योग स्थापित करण्यासाठी भागभांडवल,तांत्रिक मदत या माध्यमातून विविध सेवा उपलब्ध करून देत आहेत. 30 नोव्हेंबर 2010 रोजी राज्यात सहकारी औद्योगिक वसाहतीची नोंदणीकृत संख्या 142 इतकी होती त्यापैकी 101 वसाहती कार्यरत आहेत. कार्यरत वसाहतीमध्ये 7009 उद्योग घटक कार्यरत असून त्यात 123 लाख रोजगार निर्माण झाले आहेत.

**क) विभागीय विकास महामंडळे:**

राज्याच्या सर्व भागाचा संतुलित विकास व्हावा यासाठी पश्चिम महाराष्ट्र, कोकण मराठवाडा विदर्भ या भागासाठी विभागीय महामंडळे स्थापन करण्यात आली आहेत. प्रत्येक विभागातील उद्योजकांना सवलती मिळाव्यात यासाठी महामंडळे तयार करण्यातआली आहेत ती विभागीय विकास महामंडळे पुढीलप्रमाणे आहेत.

**1) मराठवाडा विकास महामंडळ:**

औरंगाबाद, जालना, बीड, उस्मानाबाद, लातूर, नांदेड, परभणी व हिंगोली या विभागातील औद्योगिक विकासाला गती देणे, तेथे उद्योगधंदे सुरू करणेयासाठी प्रेरणा देणे यासाठी मराठवाडा विकास महामंडळस्थापना करण्यात आली. सन 1967- मध्ये मराठवाडा विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली असून या महामंडळाचे मुख्यालय औरंगाबाद येथे आहे.

**2) विदर्भ विकास महामंडळ:**

चंद्रपूर, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, गडचिरोली, बुलढाणा, अकोला, वाशिम व अमरावती या विभागीय कार्यक्षेत्रात उद्योगधंद्यांना चालना देणे, मंजे विदर्भाचा विकास व्हावा यासठी 1970 मध्ये विदर्भ विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली असून या महामंडळाने मुख्यालय नागपूर येथे आहे.

**3) कोकण विकास महामंडळ:**

सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड व ठाणे याविभगातील कार्यक्षेत्रात आर्थिक विकास साधने व त्यासाठी शासनाच्या वेगवेगळ्या योजना राबविणे यासाठी कोकण विकास महामंडळाची स्थापना 1970 मध्ये करण्यात आली असून या महामंडळाचे मुख्यालय मुंबई येथे आहे.

**4) पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ:**

पुणे, सातारा, सांगली, नाशिक, अहमदनगर, सोलापूर, कोल्हापुर,धुळे, जळगाव व नंदुरबार या विभागातील उद्योगधंद्यांच्या विकासाला चालना देणे यासाठी सन 1970 मध्ये पश्चिम

महाराष्ट्र विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली असून त्याचे मुख्य कार्यालय पुणे येथे आहे.

**ड) विविध कृषी महामंडळे व मंडळाची स्थापना:**

राज्यातील कृषी आधारितउद्योगाचा विकास व्हावा म्हणून महाराष्ट्र शासनाने विविध महामंडळे व मंडळाची स्थापना केली आहे. ते पुढीलप्रमाणे:

1) राज्यातील खादी व ग्रामोद्योग उपक्रमाचे संघटन, विकास व विस्तार करण्यासाठी 1962 मध्ये महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग मंडळाची स्थापना करण्यात आली असून यामंडळाचे मुख्यालय मुंबई येथे आहे.

2) राज्यात कृषी उद्योगाला चालना देण्यासाठी सन 1965 मध्ये महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली असून या महामंडळाचे मुख्यालय पुणे येथे आहे.

3) राज्यातील वस्त्रोद्योगाच्या समस्या दूर करणे आणि औद्योगिकदृष्ट्या मागास भागात नव्या कापड गिरण्या स्थापन करणे व आजारी गिरण्याचे पुनर्वसन करणे या उद्देशाने 6 सप्टेंबर 1966 रोजी महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळाची स्थापना करण्यात आली असून या महामंडळाचे मुख्यालय मुंबई येथे आहे.

## ६.३ खादी व ग्रामोद्योग आयोग

### ६.३.१ प्रस्तावना:

भारतीय स्वातंत्र्य-आंदोलनाचा एक भाग म्हणून विस्कळित झालेले लघु उद्योग संघटित करण्याचे प्रयत्न सुरू झाले. महात्मा गांधींच्या मार्गदर्शनाखाली व प्रेरणेनुसार १९२२ पासून खादी उद्योगाला उत्तेजन व प्रोत्साहन मिळू लागले. नंतर खादीचा राजकीय संघर्षाशी असलेला दृढ संबंध कमी करण्यासाठी अखिल भारतीय समितीहून वेगळी अशी ‘अखिल भारत चरखा संघ’ (ऑल इंडिया स्पिनर्स असोसिएशन-आयसा) १९२५ मध्ये स्थापण्यात आली .त्यानंतर १९३५ मध्ये ‘अखिल भारतीय ग्रामोद्योग संघटना’ (ऑल इंडिया व्हिलेज इंडस्ट्रीज असोसिएशन-एआय्व्हीए) स्थापन करण्यात आली व तिच्याकडे हाताने भात सडणे, तेलघाण्या चालविणे, ताडगूळनिर्मिती, मधमाशापालन व हातकागद बनविणे हे उद्योग सोपविण्यात आले. परंतु खादी व ग्रामोद्योगांचा विकास १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाले तेव्हा खऱ्या अर्थाने भर देण्यात आला. १९५० पासून भारतात खादी व ग्रामोद्योगांवर अधिक भर देण्यातयावा असे नियोजन आयोगाचे मत होतेत्यानुसार १९५१ च्या सुमारास ‘अखिल भारत सर्व सेवा संघ’ या संघटनेने ‘अखिल भारतीय सूत उत्पादक संघटना’ व ‘अखिल भारतीय ग्रामोद्योग संघटना’ या दोन्ही संघटनांचे कार्य स्वतः कडे घेतले. भारत सरकारने १९५३ मध्ये खादी व ग्रामोद्योग यांचा विकास करण्यासाठी ‘अखिल भारतीय खादी व ग्रामोद्योग मंडळ’ स्थापन केले. केंद्र सरकारने १९५७ मध्ये अखिल भारतीय खादी व ग्रामोद्योग मंडळाला संवैधानिक दर्जा दिला आणि एप्रिल १९५७ मध्ये खादी व ग्रामोद्योग आयोग ‘अखिल भारतीय खादी व ग्रामोद्योग मंडळाची सर्व कार्ये स्वतः करू लागले.

### ६.३.२ खादी आणि ग्रामोद्योगांची उद्दिष्टे:

**१) खादी आणि इतर ग्रामोद्योगांचा विकास:**

ग्रामीण उद्योगांच्या विकासाची संभाव्यता ओळखते आणि स्थानिक पातळीवर किंवा ग्रामीण स्तरावरील उपक्रमांना प्रोत्साहन आणि विकसित करण्याचे मौल्यवान कार्य करते.

**2) रोजगार उपलब्ध करून देणे:**

ग्रामीण भागात बिगरशेती किंवाशेतीत राबणाऱ्या लोकांना रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी स्थानिक पातळीवर उपलब्ध कच्चा माल आणि मानवी साधने वापरण्यावर भर देणे. ग्रामीण विकासामध्येसहभागी इतर एजन्सींसोबत समन्वयकाची भूमिका बजावने ज्यामुळे रोजगाराच्या संधी निर्माण होण्यास मदत होईल.

**3) आर्थिक उद्दिष्ट:**

खादीचे नियोजन, प्रोत्साहन आणि उत्पादन तसेच भारतातील ग्रामीण आणि ग्रामीण उद्योगांच्या उभारणीसाठी सक्रियपणे कार्यरत करणेहे आहे. विविध कार्यक्रम आणि योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठीमंत्रालयाकडून निधी प्राप्त करणे . देशाच्या आर्थिक विकासाला मदत करणारे विक्रीयोग्य वस्तू तयार करण्यास मदत करते.

**४) व्यापक उद्दिष्ट:**

गरीबांमध्ये आत्मनिर्भरता निर्माण करणे आणि सशक्त ग्रामीण बनवणे हे त्याचे व्यापक उद्दिष्ट आहे

**५)** खादी व ग्रामोद्योगांच्या विकासाचे कार्यक्रम आखून त्यांची कार्यवाही करणे.

**६)** वित्तपुरवठा, कच्ची सामग्री, तांत्रिक मार्गदर्शन, सुधारित अवजारे व उपकरणे व विपणनसुविधा ह्यांची व्यवस्था करणे.

**७)** सरकारी संस्था व नोंदणीकृत संस्था ह्यांचे संघटन करणे

**८)** खादी व ग्रामो उद्योगांसाठी प्रशिक्षणाची व्यवस्था करणे

**८)** खादी व ग्रामो उद्योगांसाठी तांत्रिक संशोधनास प्रोत्साहन देणे.

### ६.३.३ खादी व ग्रामोद्योगांचा विकास :

१) प्रथम पंचवार्षिक योजनेत खादी व ग्रामोद्योग यांचा विकास कृषिविकासानेच साध्य होईल असे मानण्यात आले.

२) दुसऱ्या योजनेमध्ये रोजगाराच्या संधी वाढविणे, कारागिरांचे जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न करणे व अशा रीतीने ग्रामीण अर्थव्यवस्थेचे संतुलन साधूनग्रामोद्योगांचा विकास साधने.

३) चौथ्या योजनेत खादी व ग्रामोद्योगतील कारागिरांची कौशल्ये सुधारणे, त्यांना तांत्रिक मार्गदर्शन करणे, चांगली अवजारे व साधने आणि कर्ज पुरविणे यांसारख्या घटकावर भर देण्यात आला .

### ६.३.४ खादी व ग्रामोद्योगाची कार्यव्याप्ती :

खादी व ग्रामोद्योग आयोगाच्या अखत्यारात खालील २३ उद्योग येतात

(अ) (१) कापड उद्योग : खादी (सुती, लोकरी व रेशमी) हातमागावर तयार करणे.

(ब) खाद्यान्न प्रक्रिया उद्योग : (२) धान्ये व डाळी यांवर प्रक्रिया करणे (३) तेलघाण्या चालविणे (४) गूळ व खांडसारी निर्मितिउद्योग (५) ताडगूळ व ताडापासून विविध वस्तू बनविणे. (क) जंगलावर आधारलेले कुटिरोद्योग : (६) आगपेट्या बनविणे (७) साबण तयार करणे (८) लाखनिर्मिती उद्योग (९) औषधी वनस्पती व फळे जमविणे (१०) बांबू व वेतकाम (११) डिंक व राळ बनविणे (१२) काथ्या उद्योग. (ड) इतर उद्योग : (१३) हातकागद बनविणे (१४) मधुमक्षिका पालन (१५) कुंभारकाम (१६) चर्मोद्योग (१७) काथ्याखेरीज इतर धाग्यांची निर्मिती (१८) शेण व इतर पदार्थांपासून खत तयार करणे व मिथेन गॅस करणे (१९) चुना निर्मिती (२०) लोहारकाम (२१) सुतारकाम (२२) फळांवर प्रक्रिया करणे व त्यांचे परिरक्षण करणे आणि (२३) ॲल्युमिनिअमची भांडी व उपकरणे बनविणे

### ६.३.५ खादी व ग्रामोद्योगाची संशोधन :

कारागीर, पर्यवेक्षक व व्यवस्थापक यांना योग्य प्रशिक्षण देणे, सुधारित अवजारे व सामग्री गोळा करून ती उत्पादकांना सुलभ अटींवर पुरविणे ही कामगिरीही खादी आयोगाकडेच आहे. खादी आणि ग्रामोद्योग यांच्या विकासासाठी आवश्यक ती संशोधन संघटनाही आयोगाने उभारली आहे. वर्धा येथे आयोगाने 'जमनालाल बजाज केंद्रिय संशोधन संस्था' चालविली आहे. आयोगाकडून अर्थसाहाय्य घेऊन अंबर बेलनी, अंबर चरखा, धुनाई मोडिया, सुधारित घाण्या व चक्क्या, हाताने चालविता येईल असे पोहे तयार करण्याचे यंत्र, खाद्य तेलबिया भरडण्याचे यंत्र इ. विविध यंत्रे प्रचारात आली आहेत. शिवाय गोबर गॅस तयार करणे व त्याचा वापर करणे, अखाद्य तेलापासून साबण बनविणे व शास्त्रीय पद्धतीने मधमाशा पाळणे वगैरे बाबतींतही आयोगाने पुढाकार घेऊन मार्गदर्शन केले आहे. संशोधनामुळे व आयोगाच्या सुधारणांमुळे ग्रामोद्योगांचे उत्पन्न अलीकडील काही वर्षांत दुप्पट किंवा तिप्पट झाले आहे.

## ६.४ ग्रामीण अर्थव्यवस्थेतील विज्ञान आणि तंत्रज्ञानाची सध्यस्थिती

भारतातील ग्रामीण भागामध्ये तांत्रिक सुधारणा आणि सर्वसमावेशक वाढ हे विकास बिंदू आहेत. उच्च आणि चांगली उत्पादकता, सामाजिक-आर्थिक समानता, आधुनिक तंत्रज्ञानाचा सुसंवाद आणि शाश्वत वाढ हे राष्ट्राच्या प्रगतीचे आधारस्तंभ मानले आहेत. भारत सरकारने ग्रामीण भागात राहणाऱ्या सुमारे 900 दशलक्ष लोकांसाठी शिक्षणापासून ते आर्थिक साक्षरता आणि कृषी तंत्रज्ञानापर्यंत सर्व विकासाच्या योजनांचीतयारी केली आहे.ग्रामीण भारताच्या फायद्यासाठीवविकासासासाठीकेंद्र आणि राज्य सरकार एकमेकांच्या सहकार्याने वाखाणण्याजोगे कार्य करता आहेत. डिजिटल साक्षरता आणि

कनेक्टिव्हिटी यासारख्या तंत्रज्ञानाच्या आधारे श्रमिक बाजारपेठ अधिक मजबूत केली आहे . वरील मार्गाने ग्रामीण भागातील लोकांना शिक्षित करण्यासाठी आणि आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र मिळवण्यासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञानाणे  एक चांगले व्यासपीठ प्रदान केले आहे.

**1) शेती:**

भारताच्या एकूण लोकसंख्येच्या ६५% लोकसंख्या ग्रामीण भारतामध्ये आहे. एप्रिल 2016 मध्ये, भारत सरकारने राष्ट्रीय कृषी बाजार (नॅशनल ॲग्रिकल्चर मार्केट) सुरु केले . हा शेतकऱ्यांसाठी एक ऑनलाइन प्लॅटफॉर्म आहे जो एक राष्ट्र, एक बाजार धरतीवरती/ या आधारावर संपूर्ण भारतातील कृषी बाजारांना एकत्रित करतो. शेतकरी आणि व्यापाऱ्यांना कृषी उत्पन्न बाजार समिती संबंधित सर्व माहिती, शेतमाल आवक, खरेदी-विक्री व्यापार, याबाबत माहिती पाहण्यास मदत करते, अशा प्रकारे शेतकऱ्यांना बाजारपेठेतील सर्वोत्तम किंमतींसाठी बोली लावण्यास मदत होते. कृषी विपणनामध्ये एकसमानता राखणे,खरेदीदार आणि विक्रेते यांच्यातील माहितीची विषमता दूर करणे हा यामागील उद्देश होता. या उपक्रमाच्या माध्यमातून 1000पेक्षा जास्त शेतकरी व उत्पादक संघटना यांची नोंदणी करण्यात आली आहे.

**2) पर्यायी स्रोत आणि शाश्वत उपजीविका:**

ग्रामीण भागातील पुरुष रोजगाराच्या संधी मिळवण्यासाठी शहरी भागात मोठ्या प्रमाणात स्थलांतरित होत आहे.पुरुष स्थलांतरामुळे शेतीचा फटका महिलांना सहन करावा लागत आहे त्यांना  आता स्वतःहून अत्यंत श्रमिक भूमिका पार पाडाव्या लागतात, परिणामी उत्पादकता पातळी कमी होते.  त्यांना जमीन, सिंचन, पत,व बाजारपेठेतील प्रवेशाच्या इ घटकांच्या माहितीचा अभावालासामोरे/सामना करावा लागतो.  प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजना या सारख्या योजनांच्या माध्यमातून पर्यायी स्रोत उपलब्ध होत आहेत.

**३) आर्थिक समावेशन :**

देशाच्या आर्थिका विकासामध्ये समावेशकतेला अनन्य साधारण महत्व आहे. आधुनिक माहिती आणि दळणवळण यांच्या मदतीने आर्थिक वस्तू व  सेवांचा विस्तार करणारे व्यासपीठ म्हणून तंत्रज्ञान महत्वाचे कार्य करत आहेत किंवा केले आहे.दुर्गम आणि दुर्लक्षित प्रदेशामध्ये वस्तू व सेवा समाजातील शेवटच्या व्यक्तींपर्यंत पुरवण्यातमहत्व पूर्ण योगदान हे तंत्रज्ञानाचे आहे.  ग्रामीण भागात आर्थिक समावेशनासाठी तंत्रज्ञानाच्या क्षमतेचा वापर करण्यासाठी भारत सरकारचे अनेक मार्ग स्वीकारले आहेत. उदा  डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर (DBT), जन धन योजना , अटल पेन्शन योजना,  आधार आयडी यासारखे उपक्रम राबवले आहेत त्यामुळे डुप्लिकेशन व होणारी फसवणूक दूर केली आहे.  पेन्शन धारकांना/ लाभार्थ्यांना विविध योजनांचालाभ हस्तांतर करणे आणि आर्थिक व्यवहारांमध्ये पारदर्शकता व उत्तरदायित्व वाढवण्यात या व्यासपीठाची मदत झाली आहे.  जन धन योजनेच्या माध्यमातून केंद्र, राज्य आणि स्थानिक स्वराज्य संस्थां यांनी लाभार्थ्यांच्या खात्यात सर्व सरकारी योजनांचा लाभ पोहोचवण्यात वलाभ हस्तांतरण करण्यात महत्त्वपूर्ण प्रगती केली आहे.

**४) शिक्षण:**

